महाराष्ट्र शासन

# जिल्हा परिषद, गडचिरोली

## जिल्हा पेसा कक्ष

"पंचायतसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करणे) अधिनियम, १९९६" (पेसा)



# ग्रामसभा दिशानिदेशन

(Gramsabha Orientation) अंतर्गत

## "अनुसूचित क्षेत्रातील पंचायत व ग्रामसभांचे विशेष अधिकार व कार्यपध्दती वाचन साहित्य पुस्तिका"

प्रकाशक : जिल्हा परिषद, गडचिरोली

# गडचिरोली

## तालुका नकाशा

उ




| | | |
|---|---|---|
| ✻ जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र | : | १४,४१२ कि.मी. |
| ✻ जिल्ह्यातील एकूण तालुक्याची संख्या | : | १२ |
| ✻ अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट (पेसा) तालुक्यांची संख्या | : | १२ |
| ✻ अनुसूचित क्षेत्रातील एकूण (पेसा) ग्रा. पं. संख्या | : | ३६६ |
| ✻ अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट महसूली गावांची संख्या | : | १२३२ |
| ✻ पेसा नियम ४ अन्वये घोषित गावांची संख्या | : | २४१ |

**सुची**

- अंशत: अनुसूचित क्षेत्र (पेसा)
- पूर्णत: अनुसूचित क्षेत्र (पेसा)

# शुभेच्छा संदेश



केंद्र शासनाने ''पंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करणे) अधिनियम १९९६'' (पेसा) पारित करुन आदिवासींना स्वयं शासनाचा अधिकार दिला आहे. तसेच २००६ मध्ये वनहक्क कायदा पारित करुन वनातील व्यक्तीगत व सामाईक हक्क देखील प्रदान केले आहेत. या कायद्यांनी पंचायत राज संस्थाना काही विशेष अधिकार प्रदान केले आहेत. आदिवासींच्या जीवनामध्ये खुप मोठा बदल घडवून आणणारे हे दोन क्रांतीकारी कायदे आहेत. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला मोठे अधिकार प्राप्त झाल्याने तीचे कामकाज कायद्याच्या तरतूदीशी सुसंगत व परिणामकारक करण्याची काळजी आदिवासी व शासकिय अधिकाऱ्यांनी घेणे अत्यंत महत्वाचे आहे. या कायद्याबाबत नागरिकांमध्ये जाणिव जागृती निर्माण केल्याशिवाय व अनुसूचित क्षेत्रातील गावस्तरीय कर्मचारी तसेच या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेतील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिल्याशिवाय आदिवासींच्या विकासाला अपेक्षेप्रमाणे गती प्राप्त होणार नाही. पेसा कायद्या अंतर्गत ग्रामसभेला महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ४ मार्च, २०१४ अंतर्गत प्राप्त अधिकाराची लोकांमध्ये जाणीव जागृती निर्माण व्हावी या करीता ग्रामसभा दिशानिदेशन (Gramsabha Orientation) सन २०२३-२४ अंतर्गत ''अनुसूचित क्षेत्रातील पंचायत व ग्रामसभांचे विशेष अधिकार व कार्यपध्दती वाचन साहित्य पुस्तिका'' जिल्हा परिषद, गडचिरोली च्या वतीने कायद्याच्या प्रचार, प्रसिध्दीकरीता वाचन साहित्य म्हणून उपलब्ध करुन देतांना वाचन साहित्य पुस्तक आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग, वन व महसुल या सर्व विभागातील ग्रामस्तरावरील कर्मचाऱ्यांपासून ते त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत सर्वांना उपयुक्त ठरेल याची मला अपेक्षा आहे.

**आयुषी सिंह,** (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली

# शुभेच्छा संदेश



अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींना स्वयंशासनाच्या संस्था म्हणून प्रभावीपणे काम करता यावे यासाठी पंचायती संबंधीचे उपबंध अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करणे अधिनियम १९९६ (पेसा) केंद्र शासनाने पारीत केला आहे. पेसा कायद्यान्वये समुचित स्तरावरील पंचायती व ग्रामसभा यांना काही विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत. या अधिकारांचा ग्रामसभांनी निर्णय प्रक्रियेत आणि पंचायतींनी अंमलबजावणी प्रक्रियेत प्रभावीपणे वापर करणे आवश्यक आहे.

अनुसूचित क्षेत्रातील प्रत्येक पेसा गावांना स्वतंत्र ग्रामसभा घेण्याचे अधिकार प्राप्त झालेले असल्यामुळे ग्रामसभांच्या निर्णय प्रक्रियेमध्ये सुसुत्रता येण्यासाठी पेसा गावांमधील ग्रामसभा सक्षम असणे आवश्यक आहे. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना संविधानात्मक चौकटीमध्ये प्रभावीपणे निर्णय घेता यावेत, पेसा गावातील जास्तीत जास्त नागरिकांना ग्रामसभेला उपस्थित राहण्यासाठी प्रवृत्त करणे आवश्यक आहे. ग्रामसभांचे कामकाज सुव्यवस्थितपणे पार पाडावे यासाठी ग्रामसभांचे सुलभीकरण होणे आवश्यक आहे. पेसा कायद्यातील तरतुदींची माहिती पेसा ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, पेसा मोबिलायझर, इतर लोकप्रतिनिधी व गावस्तरीय कर्मचारी व सर्व सामान्य नागरिकांना व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत सन २०२३-२४ या वर्षामध्ये ग्रामसभा दिशा निदेशन उपक्रमांतर्गत सदरची माहिती पुस्तिका तयार करुन उपलब्ध करुन देतांना आनंद होत आहे. याचा वाचकांनी अभ्यास करुन ग्रामसभेच्या प्रभावी सक्षमीकरणासाठी वापर करावा.

**रविंद्र एस. कणसे**
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
तथा नोडल अधिकारी (पेसा)
जिल्हा परिषद, गडचिरोली

## - अनुक्रमणिका -


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | पेसा कायद्याची पार्श्वभूमी व महत्वाच्या तरतुदी | १–४ |
| २. | अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) सांख्यिकीय माहिती | ५ |
| ३. | अनुसूचित क्षेत्रातील पंचायत / ग्रामसभेचे अधिकार | ६–८ |
| ४. | पेसा कायद्याची वैशिष्टये | ९–१२ |
| ५. | अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेची कार्यपध्दती | १३–२५ |
| | **शासन अधिनियम / अधिसुचना** | |
| ६. | पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करणे) अधिनियम १९९६ | २७–३३ |
| ७. | महाराष्ट्र ग्रामपंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ | ३४–४७ |


कायद्याची व शासन निर्णयाची सामान्य लोकांना माहिती व्हावी म्हणून सदरचे पुस्तक तयार केले आहे. एखाद्या बाबी बाबत संभ्रम निर्माण झाल्यास संबंधित कायदे व शासन निर्णय अंतिम मानावेत.



# अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) ग्रामसभेची कार्यपद्धती

## पेसा कायद्याची पार्श्वभूमी व महत्त्वाच्या तरतुदी



**प्रस्तावना –**

भारतीय राज्यघटनेच्या ७३ व्या घटनादुरूस्तीने भाग नऊ मध्ये पंचायतीसंबंधीच्या तरतुदी समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. मात्र संविधानाच्या अनुच्छेद २४३ (ड) मधील तरतुदीनुसार संविधानातील भाग ९ मधील पंचायतीसंबंधीच्या तरतुदी अनुसूचित क्षेत्राला लागू होत नाहीत. परिणामी ७३ व्या घटनादुरूस्तीचा अंमल अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींवर होवू शकत नव्हता. हा घटनात्मक पेच होता.

हा घटनात्मक पेच सोडविण्यासाठी आणि ७३ व्या घटनादुरूस्तीनुसार पंचायतीसंबंधीच्या तरतुदी अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींना कशा पद्धतीने लागू करता येतील, याचा अभ्यास करण्यासाठी केंद्र शासनाने डॉ. दिलीपसिंह भुरिया यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे केंद्र शासनाला एक कायदा करणे आवश्यक होते.

त्यानुसार केंद्र शासनाने पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ पारित केला. अर्थात Provisions of the Panchayats (Extension to the Scheduled Areas) Act, 1996. या नावातील आद्याक्षरे घेऊन 'PESA' हे नाव तयार झाले.

**अनुसूचित क्षेत्राचे निकष :**

**एखादे क्षेत्र,**

- **अनुसूचित जमातीचे प्राबल्य**
- **एकजिनसी व वाजवी आकाराचे क्षेत्र**
- **जिल्हा, तालुका यासारखी व्यवहार्य प्रशासकीय संरचना**
- **शेजारच्या भागाच्या तुलनेत या भागाचे आर्थिक मागासलेपण**

### १.१ केंद्रीय पेसा कायदा लागू असणारी राज्ये :



## पेसा कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी

पेसा कायद्याच्या कलम ४ मध्ये खालील काही अपवाद व आपरिवर्तने नमूद करण्यात आलेली आहेत.

संविधानाच्या भाग नऊमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही राज्याचे विधानमंडळ त्या भागाअन्वये, पुढीलपैकी कोणत्याही बाबींशी विसंगत असेल असा कोणताही कायदा करणार नाही; त्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत

(क) **पंचायतीसंबंधात** * करता येईल असे कोणतेही राज्य विधी विधान रुढीगत कायदा, सामाजिक व धार्मिक प्रथा आणि सामूहिक साधनसंपत्तीच्या परंपरागत व्यवस्थापनाच्या प्रथा यांच्यांशी सुसंगत असेल;

(ख) गाव हे सामान्यतः एक वस्ती किंवा वस्त्यांचा गट मिळून किंवा पाडा किंवा पाड्यांचा गट मिळून बनलेले असेल व त्यात **एक समाज** असून तो आपल्या परंपराच्या व रुढींच्या अनुसार आपले व्यवहार चालवीत असेल;

(ग) प्रत्येक गावात, ग्रामपातळीवरील पंचायतीसाठी असलेल्या मतदार याद्यांमध्ये ज्यांची नावे अंतर्भूत केलेली आहेत अशा व्यक्तींचा समावेश असलेली ग्रामसभा असेल;

(घ) प्रत्येक ग्रामसभा, लोकांच्या परंपरा व रुढी, त्यांची सांस्कृतिक अस्मिता, सामूहिक साधनसंपत्ती आणि तंटे मिटवण्याची रुढीगत पध्दती सुरक्षित ठेवण्यास व जतन करण्यास सक्षम असेल;

**(ङ) प्रत्येक ग्रामसभा**

(एक) : ग्रामपातळीवर पंचायतीकडून सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांच्या कार्यान्वयाचे काम सुरू होण्यापूर्वी अशा योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांना मान्यता देईल;

(दोन) : दारिद्र्य निर्मूलनाच्या व इतर कार्यक्रमाखाली कोणत्या व्यक्ती लाभाधिकारी आहेत हे ओळखण्यास किंवा त्याची निवड करण्यास जबाबदार असेल

(च) ग्रामपातळीवरील प्रत्येक पंचायतीला, खंड (ङ) मध्ये निर्देश केलेल्या योजना कार्यक्रम व प्रकल्प यांच्यासाठी त्या पंचायतीने केलेल्या निधीच्या वापराचे प्रमाणपत्र ग्रामसभेकडून मिळवावे लागेल;

(छ) प्रत्येक पंचायतीमधील अनुसूचित क्षेत्रातील जागांचे आरक्षण हे, त्या पंचायतीमधील ज्या जमातीसाठी संविधानाच्या भाग नऊखाली आरक्षण द्यावयाचे योजलेले असेल त्या जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुरुप असेल;

परंतु, अनुसूचित जनजातीसाठी असलेले आरक्षण जागांच्या एकूण संख्येच्या एक द्वितीयांशापेक्षा कमी असणार नाही;

परंतु आणखी असे की, सर्व पातळीवरील पंचायतींच्या सभापतींच्या सर्व जागा अनुसूचित जनजातीसाठी राखून ठेवण्यात येतील;

(ज) मध्यम पातळीवरील पंचायतीमध्ये किंवा जिल्हापातळीवरील पंचायतीमध्ये ज्यांचे प्रतिनिधित्व नसेल अशा अनुसूचित जनजातींमधील व्यक्तींना राज्यशासन नामनिर्देशित करू शकेल;

परंतु, असे नामनिर्देशन, त्या पंचायतीमधून निवडून द्यावयाच्या एकूण सदस्यांच्या संख्येच्या एक–दशांशापेक्षा अधिक असणार नाही;

(झ) अनुसूचित क्षेत्रांमध्ये विकास प्रकल्पांसाठी जमीन संपादन करण्यापूर्वी आणि अनुसूचित क्षेत्रांतील अशा प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या व्यक्तींची पुनर्वसाहत किंवा त्यांचे पुनर्वसन करण्यापूर्वी ग्रामसभेचा किंवा समुचित पातळीवरील पंचायतींचा सल्ला घेण्यात येईल;

अनुसूचित क्षेत्रांतील प्रकल्पांचे प्रत्यक्ष नियोजन आणि कार्यान्वयन यांचा समन्वय राज्य पातळीवर साधण्यात येईल;

(ञ) अनुसूचित क्षेत्रातील **लहान जलस्त्रोतांचे** नियोजन व व्यवस्थापन करण्याचे काम समुचित पातळीवरील पंचायतींकडे सोपविण्यात येईल;

(ट) अनुसूचित क्षेत्रांमध्ये गौण खनिजांसाठी पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा देण्यापूर्वी समुचित पातळीवरील ग्रामसभेच्या किंवा पंचायतींच्या शिफारशी अनिवार्य करण्यात येतील;

(ठ) गौण खनिजांचे उत्खननाद्वारे समुपयोजना करण्याकरिता सवलत देण्यापूर्वी समुचित पातळीवरील ग्रामसभेच्या किंवा पंचायतींच्या शिफारशी अनिवार्य करण्यात येतील;

(ड) अनुसूचित क्षेत्रांतील पंचायतींना, स्वयंशासनाच्या संस्था म्हणून काम करणे त्यांना शक्य व्हावे यासाठी आवश्यक असतील असे अधिकार व प्राधिकार देतेवेळी राज्य विधानमंडळ, समुचित स्तरावरील पंचायती व ग्रामसभा यांना विनिर्देशपूर्वक,

(एक) : मादक द्रव्यांची विक्री व सेवन यांना मनाई करण्याचा किंवा त्यांचे विनियमन करण्याचा किंवा त्यांवर निर्बंध घालण्याचा अधिकार;

(दोन) : गौन वन–उत्पादनाची मालकी;

(तीन) : अनुसूचित क्षेत्रातील जमिनीच्या अन्य संक्रमणास प्रतिबंध करण्याची आणि अनुसूचित जनजातीच्या अवैधरीत्या अन्य संक्रामित झालेल्या कोणत्याही जमिनीच्या पुनःस्थापनासाठी समुचित कृती करण्याचा अधिकार;

(चार) : ग्रामीण बाजारपेठांच्या मग त्या कोणत्याही नावाने ओळखल्या जावोत,

व्यवस्थापनाचा अधिकार;

(पाच) अनुसूचित जनजाती सावकारी करण्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार;

(सहा) सर्व सामाजिक प्रभागांमधील संस्था आणि कार्यकर्ते यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार; आणि

(सात) जनजाती उप–योजनांसह स्थानिक योजना आणि अशा योजनांसाठी लागणारी साधनसंपत्ती यांवरील नियंत्रणाचा अधिकार;

उपरोक्त अधिकार व प्राधिकार समुचित स्तरावरील पंचायती व ग्रामसभा यांना देण्यात आले आहेत, हे विधानमंडळ सुनिश्चित करील.

(ढ) स्वयंशासनाच्या संस्था म्हणून काम पार पाडणे पंचायतींना शक्य व्हावे यांसाठी आवश्यक असतील असे अधिकार व प्राधिकार त्यांना देणाऱ्या राज्याच्या विधी विधानामध्ये, उच्च पातळीवरील पंचायती या निम्न पातळीवरील कोणत्याही पंचायतीचे किंवा ग्रामसभेचे अधिकार व प्रधिकार धारण करीत नाहीत, हे सुनिश्चित करण्यासाठी संरक्षक उपाययोजनांचा अंतर्भाव असेल.

(ण) राज्य विधानमंडळ, अनुसूचित क्षेत्रातील जिल्हा स्तरावरील पंचायतीमध्ये प्रशासकीय व्यवस्था करतेवेळी संविधानाच्या **सहाव्या अनुसूचीच्या** * पध्दतीचे अनुपालन करण्याचा प्रयत्न करील.

उपरोक्त महत्त्वाच्या तरतुदी पेसा कायद्यामध्ये करण्यात आलेल्या आहेत. या तरतुदींच्या आधारे पेसा कायद्याची महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलबजावणी सुरू आहे.

७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायतराज व्यवस्थेमध्ये आणलेले सत्तेचे विकेंद्रीकरण अनुसूचित क्षेत्रामध्ये पोहोचवण्याच्या दृष्टीने पेसा अत्यंत महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्यामुळे अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींना स्वयंशासनाच्या संस्था म्हणून काम करणे शक्य होणार आहे. तसेच या क्षेत्रातील लोकांचे रुढीगत कायदे, सामाजिक व धार्मिक प्रथा, साधनसंपत्तीचे परंपरागत व्यवस्थापन यांच्यावर अन्य कायद्यांचे अतिक्रमण टाळता येईल. या कायद्याने मिळालेल्या संरक्षणामुळे पंचायत व ग्रामसभा सक्षम होईल.

**पंचायत :** पेसा कायद्यामध्ये 'पंचायत' हा शब्द व्यापकपणे वापरला आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या सर्वांसाठी पंचायत ही संज्ञा वापरली आहे. सदर संज्ञा संविधानामध्ये केलेल्या व्याख्येनुसार वापरली आहे. कायद्यातील तरतुदीचा अर्थ लावताना ही बाब विशेषत्वाने लक्षात ठेवावी लागते.

**संविधानातील पंचायतीची व्याख्या पुढीलप्रमाणे :** (घ) 'पंचायत' याचा अर्थ, ग्रामीण क्षेत्रांसाठी अनुच्छेद २४३ ख अन्वये घटित करण्यात आलेली स्वराज्य संस्था (मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो), असा आहे.

**सहावी अनुसूची :** राज्यघटनेच्या सहाव्या अनुसूचीमध्ये आसाम, मेघालय, त्रिपुरा आणि मिझोराम या राज्यांमधील आदिवासी लोकसंख्येच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी आदिवासी क्षेत्राच्या प्रशासनाची तरतूद आहे.

# अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) ग्रामपंचायत सांख्यिकी माहिती

पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करणे) अधिनियम १९९६ हा कायदा केंद्र शासनाने दिनांक २४ डिसेंबर, १९९६ रोजी पारीत केला असून मा. महामहिम राष्ट्रपती भारत सरकार यांचे अधिसूचनेद्वारे दिनांक २ डिसेंबर, १९८५ ला घोषित केलेल्या राजपत्रात महाराष्ट्र राज्यातील १३ जिल्हांचा समावेश करण्यात आलेला आहे. या मध्ये गडचिरोली जिल्हाचा समावेश असुन अंषतः अनुसूचित क्षेत्र (पेसा) मध्ये देसाईगंज, आरमोरी, गडचिरोली, चामोर्शी व मुलचेरा या ०५ तालुक्यांचा समावेश होतो. तर पुर्णः अनुसूचित क्षेत्र (पेसा) मध्ये कोरची, कुरखेडा, धानोरा, अहेरी, एटापल्ली, भामरागड व सिरोंचा या ०७ तालुक्यांचा समावेश होतो. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायती व गावांचा समावेश असलेला गोषवारा खालील प्रमाणे

| अ.क्र. | तालुका | अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) ग्रामपंचायत संख्या | अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) महसुली गावांची संख्या | पेसा नियम ४ अन्वये घोषित गांव/वस्ती/पाड यांची संख्या | एकुण गावांची संख्या | अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) ग्रामपंचायतींची एकुण लोकसंख्या | अनुसूचित जमातीची एकुण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **अ** | **ब** | **क** | **(अ-ब-क)** | | |
| १ | अहेरी | ३९ | १५१ | २८ | १७९ | १०६२४३ | ५६९२४ |
| २ | आरमोरी | १८ | ४७ | ११ | ५८ | ३०४३६ | १३२३३ |
| ३ | भामरागड | १९ | १०४ | १२ | ११६ | ३०१५५ | २६०९५ |
| ४ | चामोर्शी | ३९ | ७७ | ४ | ८१ | ५१२३२ | १६८३६ |
| ५ | देसाईगंज | ९ | ९ | ० | ९ | १७४६८ | ३४०३ |
| ६ | धानोरा | ६१ | २१८ | १३ | २३१ | ७६७२५ | ५५९४८ |
| ७ | एटापल्ली | ३१ | १८० | ९४ | २७४ | ७१५५५ | ६१६४१ |
| ८ | गडचिरोली | २६ | ५८ | ४ | ६२ | २९१४० | ११०२१ |
| ९ | कोरची | २९ | १२१ | १८ | १३९ | ३९०३६ | २९५८३ |
| १० | कुरखेडा | ४५ | ११९ | ३८ | १५७ | ७८८९७ | ४५५५३ |
| ११ | मुलचेरा | ११ | ३७ | ८ | ४५ | १७५५८ | ११८८२ |
| १२ | सिरोंचा | ३९ | १११ | ११ | १२२ | ६४१३५ | १६५४७ |
| **एकुण** | | **३६६** | **१२३२** | **२४१** | **१४७३** | **६१२५८०** | **३४८६६६** |

# अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) ग्रामसभेचे अधिकार

पंचायतीसंबंधी उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करणे) अधिनियम १९९६ नुसार अनुसूचित क्षेत्रातील पंचायतशी संबंधित बाबी भारतीय राज्य घटनेच्या भाग ९ मध्ये समाविष्ठ केलेला आहे.

१) पाडे/वस्ती/वाडया यांना नवीन स्वतंत्र गाव होण्याचा व ग्रामसभा घेण्याचा अधिकार.
२) आदिवासी समुहाचे रुढी, परंपरा जतन करण्याचा अधिकार.
३) विविध योजना, कार्यक्रम आराखडे कामे मंजूर करण्याचा अधिकार.
४) विकास योजना कार्यक्रम आराखडे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार.
५) विकास कामांची उपयोगीता प्रमाणपत्र देण्याचा अधिकार.
६) गौण वनोपज वापर उपयोग आणि लिलावाचा अधिकार.
७) जमीन अधिग्रहणापूर्वी ग्रामसभेची मंजूरी घेण्याचा अधिकार.
८) आदिवासी बांधवांची बेकायदेशिररित्या संपादित केलेली जमीन परत करण्याचे अधिकार.
९) लघु जलसंचय आणि मासेमारी व्यवस्थापनाचे अधिकार.
१०) गौण खनिजाबाबत उत्खननास शिफारस नाकारण्याचे अधिकार.
११) अनाधिकृत सावकारीला आळा घालणे व व्याजाने रक्कम देण्यावर प्रतिबंध करणे.
१२) अंमली पदार्थाचे नियमन करण्याचे अधिकार.
१३) बाजारांच्या व्यवस्थापनाचे अधिकार.
१४) लाभार्थ्यांची निवड करण्याचे अधिकार.
१५) नैसर्गीक साधनसंपत्ती शेती व जमीन यांचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार.
१६) गावातील सर्व लोकांनी ग्रामसभेच्या माध्यमातून स्वत:चा कारभार स्वत: करण्याचा अधिकार.

वरील बाबी अंमलात आणण्याकरीता महाराष्ट्र शासनाने मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ मध्ये काही सुधारणा केलेल्या आहेत. सन २००३ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार मुंबई ग्रामपंचायत अधिनियमामध्ये कलम ५४ अ,ब,क,ड यांचा अंतर्भाव केलेला आहे. सदर कलमांच्या ठळक बाबी खालीलप्रमाणे :

## महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ५४ (अ)

१. आदिवासींच्या सांस्कृतिक ओळख, त्यांचे सामुहिक उपजिविकेचे साधन, त्यांचेमधील वाद सोडविण्याची व्यवस्था यांचे जतन करणे.

२. ग्रामपंचायत क्षेत्रात सामाजिक व आर्थिक विकासाकरीता तयार केलेल्या योजना कार्यक्रम व प्रकल्प यांच्या अंमलबजावणीस मान्यता देणे.

३. ग्राम पंचायतीने योजना कार्यक्रम व प्रकल्प यावर केलेल्या खर्चास उपयोगिता प्रमाणपत्र देणे.

४. केंद्र व राज्य शासनाच्या योजनेच्या अंमलबजावणीस प्राथमिकता देणे तसेच लाभार्थी निवडीचे अधिकार ग्रामसभेला राहतील.

५. दारुबंदी व मादक पदार्थ विक्री व वापर यावर प्रतिबंध करणे.

६. गौण वनोपज गोळा करणे, त्यांचे व्यवस्थापन करणे याबद्दल ग्राम पंचायतीला निर्देश देण्याचे काम ग्रामसभेने करणे.

७. अनुसूचित क्षेत्रातील जमीन हस्तांतरण व अनुसूचित जमातीची नियमबाह्य बळकाविलेली जमीन संबंधितास देण्याबद्दल जिल्हाधिकारी यांचेकडे अभिप्राय कळविणे.

८. रक्कम व्याजाने देण्याबद्दल परवाना देणे याबद्दल ग्राम पंचायतला सल्ला देणे.

९. लघुसिंचन व्यवस्थापन करणे.

१०. ग्रामीण भागात गावात बाजार स्थापन करणे.

११. सामाजिक संस्थांवर नियंत्रण ठेवणे.

## महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ५४ (ब)

१. ग्राम पंचायतचे योजना कार्यक्रम व प्रकल्पावर केलेल्या खर्चास उपयोगिता प्रमाणपत्र ग्रामसभेकडून घेणे.

२. अनुसूचित क्षेत्रातील जमीनीसंबंधी भुसंपादन विभागाने ग्राम पंचायतचे मत घेणे.

३. गौण खनिज व खनिजासंबंधी परवाना देणेबद्दल संबंधित विभागाला ग्राम पंचायतीचे अभिप्राय कळविणे.

४. ग्रामपंचायत क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्थांवर नियंत्रण ठेवणे व पंचायत समिती/जिल्हा परिषद यांना अभिप्राय कळविणे.

५. गौन वनोपज गोळा करणे, विक्री करणे, व्यवस्थापन करणे याबद्दल ग्राम पंचायतला अधिकार राहील.

६. लघुसिंचन व्यवस्थापन करणे.

७. गावात बाजार स्थापन करुन त्यांचे व्यवस्थापन करणे व याबद्दल ग्रामसभेची मंजूरी घेणे.

८. ज्या अनुसूचित क्षेत्रात अनुसूचित जमातीची लोकसंख्या ५०% चे वर आहे त्या ठिकाणी सरपंच पद हे अनुसूचित जमातीकरीता आरक्षित राहील.

९. झाडे तोडण्याकरीता ग्रामसभेचे मान्यतेने संबंधित विभागाला अभिप्राय देणे.

१०. ग्रामपंचायतने स्वत:चे अंदाजपत्रक तयार करणे व ग्रामसभेची मान्यता घेणे.

## महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ५४ (क)

१. ग्राम पंचायत सचिव हा ग्रामसभेचा सचिव राहील. ग्रामसभेची सभा बोलाविणे. सभेचे इतिवृत्त लिहिणे इत्यादी जबाबदारी त्यांची राहील.

२. ग्रामसभेचे नोटीसमध्ये सभेची तारीख, जागा व वेळ नमुद राहील. तसेच ग्रामसभेची नोटिस १५ दिवसांचे पूर्वी द्यावी लागेल.

३. प्रत्येक आर्थिक वर्षातील पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष हा ग्रामपंचायत सरपंच राहील. त्यांचे गैरहजरीत उपसरपंच अध्यक्ष राहील. दोघेही हजर नसेल तर ग्रामपंचायतचे एक (अनुसूचित जमाती) सदस्याची निवड होईल. त्यानंतर होणाऱ्या ग्रामसभेस बहुमताने एक व्यक्तीची निवड सभेचा अध्यक्ष म्हणून करता येईल.

४. प्रत्येक ग्रामसभेस संबंधित गावाचा कोतवाल, तलाठी, पोलिस पाटील, आरोग्य अधिकारी, प्राथमिक व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, कृषी अधिकारी, म.रा.वि.मं. चे कनिष्ठ अभियंता व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी हजर राहतील.

५. ग्रामसभेचे गणपूर्तीकरीता एकुण मतदारांच्या २५ टक्के मतदार किंवा १०० मतदार जे कमी असेल ते आवश्यक आहे.

६. तहकुब सभेला सुध्दा गणपूर्ती आवश्यक आहे.

## महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ५४ (ड)

१. ग्रामसभेने मंजुर केलेले ठरावाचे व सल्ल्याचे पालन सरपंचांनी, उपसरपंचांनी करावे. कसुर झाल्यास सरपंच, उपसरपंच हे अपात्रतेच्या कार्यवाहीस पात्र राहिल. परंतु सदर ठराव शासनाच्या मान्यतेने अंमलात येईल.

२. ग्राम पंचायतीचे सर्व कर्मचारी ग्रामसभेच्या ठरावाचे अंमलबजावणी करतील आणि त्यांनी केलेल्या कामाचा अहवाल ग्रामसभेसमोर ठेवतील. जर त्यांनी या कामाला कसुल केला तर ग्रामसभेचे सदस्यांचे बहुमताने ठराव घेतल्यास संबंधीत कर्मचाऱ्यावर विभागामार्फत शिक्षा देण्याची कार्यवाही होऊ शकते, परंतु सदर ठरावास शासनाची मान्यता लागले.

३. ग्रामसभेने ५० टक्के बहुमताने सरपंच, उपसरपंच यांच्याविरुध्द आणल्यास ते पदावर राहु शकणार नाही. परंतु सदर ठराव आणण्याकरीता ग्रामसभेचे सदस्यांपैकी १/३ सदस्यांनी प्रस्ताव आणणे आवश्यक आहे. सदर नोटीस ग्रामसभेच्या सचिवास देणे आवश्यक आहे व ग्रामसभेच्या सचिवाने सदर नोटीस तहसिलदाराकडे त्वरीत देणे आवश्यक आहे.

४. अविश्वासाच्या ठरावाचा प्रस्ताव झाल्यावर तहसिलदार हे १५ दिवसांचे आंत ग्रामसभेची सभा बोलावतील नायब तहसिलदारापेक्षा कमी दर्जाचे नसणारे अधिकारी हे सभेचे अध्यक्ष राहील. सदर सभा तहकुब करता येणार नाही.

५. अविश्वासाचा ठराव मंजूर न झाल्यास २ १/२ वर्षापर्यंत असा ठराव आणता येणार नाही. सदर ठरावाचे कायदेशिरपणाबद्दल सरपंच जिल्हाधिकारी यांचेकडे अपिल करु शकतील.

६. सरपंच व उपसरपंच यांचे पद रिक्त झाल्यास त्यांची नियमानुसार फेर निवडणूक घेता येईल.

७. ग्राम पंचायतच्या सदस्यांविरुध्द ग्रामसभेचे ५० टक्के पेक्षा कमी नसलेल्या बहुमताने ठराव पारित केल्यास तो वरीलप्रमाणे सदस्य राहण्यास अपात्र होईल.

# पेसा कायद्याची वैशिष्टये

आदिवासी समाजाची एक स्वतंत्र जीवन शैली आहे. रूढ़ी, प्रथा, परंपरा आणि सामाजिक कायदे याच्या आधारे स्वशासन अशी यांची वैशिष्टयपूर्ण समाज व्यवस्था अस्तित्वात होती. इंग्रजाच्या काळामधे त्यांच्या जमीन व जंगलावरील हक्क हिरावला गेल्याने त्याच्या स्वयंपूर्ण समाज व्यवस्थेला तडा गेला आणि त्याचे जीवन परावलंबी झाले. त्यामुळे त्याना विविध समस्याना तोंड द्यावे लागत आहे. पेसा कायद्याने अनुसूचित क्षेत्रातील पंचायत/ग्रामसभा यांना अधिकार बहाल केले आहे.

**१) सामाजिक हित :**

रूढी, परंपरा, प्रथा व सांस्कृतिक ओढ याचे जतन व संवर्धन करण्यास तसेच सामूहीक मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यास आणि आपआपसातील तंटे मिटवण्यास ग्रामसभा सक्षम असेल.

**२) आरक्षण :**

लोकसंख्येच्या प्रमाणात परंतु निम्म्यापेक्षा कमी नाही इतके पंचायत राज संस्थामध्ये लोकप्रतिनिधी पदाचे आरक्षण.

**३) ज़मीन सुरक्षा :**

आदिवासींच्या खाजगी मालकीच्या जमिनीचे बिगर आदिवासीकडे होणाऱ्या हस्तांतरणावर निर्बंध व कायदेशीर हस्तांतरित झालेल्या जमीनीचे आदिवासिकडे पुन:स्थापना.

**४) भुमी संपादन व पुनर्वसन :**

जमिनीचे संपादन व विस्थापिताचे पुनर्वसन करण्यापूर्वी ग्रामसभेचा सल्ला घेणे अनिवार्य.

**५) गौण वनउपज :**

गावाच्या वाहिवाटाखालील वनक्षेत्रात मिळणाऱ्या गौण वनोपजाची मालकी गावाची असेल व तिचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार असेल.

**६) लघु जलसाठे :**

अनुसूचित क्षेत्रातील १०० हेक्टर पर्यंतच्या जल साठयाचे नियोजन व व्यवथापन पंचायतीचे नियंत्रणाखाली असेल.

**७) बाजाराचे व्यवस्थापन :**

गाव क्षेत्रामध्ये गांव बाजारासाठी ग्रामसभेकडून मान्यता मिळाल्यानंतर तो स्थापन करुण चालविण्यास सक्षम असेल. याबाबत ग्रामसभेने बहुमताने घेतलेला कोणताही निर्णय हा पंचायतीवर बंधनकारक असेल.

**८) सावकारी धंद्याचे नियमन :**

मुंबई सावकारी अधिनियम १९४६ अन्वये अनुसूचित क्षेत्रातील सावकारी व्यवहारावर नियंत्रण

ठेवणे. परवाने देण्याकरीता आणि सावकारी धंद्याचा वार्षिक आढावा घेण्याकरिता संबंधित पंचायतीमार्फ़त विचार विनिमय करणे. ग्रामसभेने घेतलेला निर्णय हा समुचित स्तरावर संबंधित पंचायतीमार्फ़त विचार विनिमय करणे. ग्रामसभेने घेतलेला निर्णय हा समुचित स्तरावर संबंधित प्राधिकरणावर व पंचायतीवर बंधनकारक असेल.

**९) गांव विकास :**

गांव विकास आराखडयाला, / योजनेला मंजूरी देण्याचा व शासकीय विकास योजनांचे प्राधान्य क्रम ठरविन्याचा व रोजगारासाठी लाभार्थि निवडन्याचा अधिकार ग्रामसभेला असेल.

**१०) आर्थिक व्यवस्थापन :**

गांव विकासासाठी येणाऱ्या निधीवर ग्रामसभेचे नियंत्रण असेल. पंचायतीने केलेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र देण्याचे अधिकार ग्रामसभेला असेल.

**११) शासकीय कार्यालयावर नियंत्रण :**

आदिवासी विकासासाठी निगडित शासकीय कार्यालये व खाजगी संस्थावर ग्रामसभेचे नियत्रंण असेल.

**१२) अंमली पदार्थाचे नियमन :**

अंमली पदार्थाच्या सेवनाचे नियमन ग्रामसभा करेल किंवा त्यांच्या विक्रीवर निर्बंध घालू शकेल.

## अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा

१) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला मोठा अधिकार प्राप्त झाल्याने तिचे कामकाज कायद्याच्या तरतूदीशी सुसंगत व परिणामकारक करण्याची काळजी आदिवासी व शासकीय अधिकाऱ्यांनी घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

२) पेसा मोबीलायझर यानी गृहभेटी देऊन ग्रामसभेला प्रसिद्धी द्यावी व जास्तीत जास्त लोक उपस्थित राहतील यांची काळजी घ्यावी.

३) ग्रामसभेची नोटिस ग्राम सभेच्या किमान १५ दिवस अगोदर देणे बंधनकारक आहे.

४) सभेच्या नोटीस मध्ये सभेचे ठिकाण /वेळ/विषय नमूद करणे आवश्यक आहे.

५) ग्राम सभेचा कोरम २५ टक्के किंवा १०० पैकी जे कमी असेल इतका असेल.

६) अनुसूचित क्षेत्रातील ग्राम सभेत गणपूर्ती झाल्याशिवाय कोणतेही निर्णय घेता येत नाही.

७) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेच्या अध्यक्ष पदी अनुसूचित जमातीच्या सदस्याची निवड करण्यात यावी.

८) सभेचे ठराव सुस्पष्ट, मुद्देसुद व अर्थपूर्ण असावेत.

९) सभेला उपस्थित असणाऱ्या मतदार ग्रामस्थानी सही, अंगठा, हजेरी द्यावी

१०) सभेला कार्यवृतान्त सविस्तर लिहावा त्याखाली ग्रामसभा अध्यक्ष व सचिव यानी स्वाक्षरी करावी.

## ग्रामसभा आणि आपण

१) ग्रामसभेत उपस्थित राहुन गावाच्या विकासात सहभागी व्हा.

२) आपला व आपल्या गावाचा विकास देशाचा विकास ठरू शकतो.

३) ग्रामसभा नियमीत भरवीने व नियमा नुसार चालविणे यासाठी आग्रही रहा.

४) गावाच्या विकासामध्ये सहभागी होण्यासाठी ग्राम सभेत सर्वानी उपस्थित राहावे यासाठी प्रयत्न करा.

५) मागास व गरीब लोकांना ग्रामसभेत न्याय मिळेल यांची खात्री बाळगा.

६) ग्रामसभा सर्वाना समान न्याय देईल यासाठी आग्रही रहा.

७) सर्वाना मोकळेपणाने व निर्भयतेने ग्रामसभेत सहभाग घेता येईल यासाठी जागृत रहा.

८) ग्रामसभेच्या अध्यक्षाला सभेचे कामकाज चालविण्यासाठी सहकार्य करा.

९) ग्रामसभेला विकास कामाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्याचा अधिकार आहे हे लक्षात घ्या.

१०) ग्रामसभेचे सर्व कामकाज शांततेत व सर्वाच्या सहभागाने पार पडेल यासाठी सहकार्य करा.

## ग्रामसभेला का जायचं ?

१) आपल्या व गावाच्या विकासाचे निर्णय ग्राम सभेत होतात म्हणून ग्राम सभेला उपस्थित रहा.

२) आपला व गावाचा विकास ग्राम सभेच्या माध्यमातून करता येतो. म्हणुन तुम्ही ग्राम सभेला उपस्थित रहा व इतरांनाही उपस्थित राहण्यास आग्रह धरा.

३) आपले, आपल्या कुटुंबाचे व गावाचे भविष्य निश्चित करण्यासाठी ग्राम सभेला उपस्थित रहा.

४) ग्रामसभा गावाच्या विकासाचे व्यासपीठ आहे त्यामुळे ग्राम सभेत तुमचा सहभाग महत्वाचा आहे.

५) गाव घड़वायचे असेल तर ग्राम सभेला जा.

६) ग्रामपंचायतीने केलेल्या खर्चाला मान्यता ग्रामसभा देते. पैशाचा योग्य विनियोग होतो किंवा नाही याची खातरजमा करण्यासाठी ग्रामसभेला जा.

७) गांव विकासाचे सर्व निर्णय ग्रामसभेत होतात. त्यामुळे सर्व सदस्यांनी ग्रामसभेला उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

८) विकास योजनांना व प्रकल्पाना ग्रामसभेची पूर्व संमती आवश्यक असल्याने गावाचा विकास करण्यासाठी ग्रामसभेला जा.

९) शासनाचे विविध योजनांचे लाभार्थी निवडण्यासाठी ग्रामसभेला जा.

१०) शासनाचे विविध योजनाचे प्रधान्यक्रम ठरविन्यासाठी ग्रामसभेला जा.

११) वर्षातील पहिल्या ग्रामसभेत पंचायतीच्या जमा खर्चाची माहिती सर्व करदात्यांना मिळवून देण्यासाठी ग्रामसभेला जा.

१२) विकासकामे करणाऱ्या सरकारी, खाजगी कार्यालयाच्या कामकाजावर ग्रामसभा नियंत्रण ठेवू शकते, या अधिकाराद्वारे विकास कामाची योग्य अंमलबजावणी करुण घेण्यासाठी ग्रामसभेला जा.

१३) गावाचा विकास आराखडा ग्रामसभा मंजूर करते, त्यात तुमचा सहभाग नोंदविण्यासाठी ग्रामसभेला जा.

१४) गावाच्या विकासासाठी महत्वाच्या समितीचे गठन ग्राम सभेला करण्याचा अधिकार आहे. उदा, वनहक्क समिती, संयुक्त वन समिती,संयुक्त वन व्यवस्थापन समिती, दक्षता व संनियंत्रण समिती, ग्रामकोष समिती, मादक द्रव्य नियंत्रण समिती, सावकारी प्रथा निर्बंध समिती या समित्यामध्ये सहभाग घेण्यासाठी ग्रामसभेला जा.

१५) ग्रामसभेला जमीनसंपादन व पुनर्वसन याबाबत शिफारस करण्याचा अधिकार आहे. या अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामसभेला जा.

१६) गौणखनिजाचा भाड़ेपटी किवा लिलाव करण्यापूर्वी ग्रामसभेची मान्यता घेणे बंधनकारक आहे, या अधिकाराचा वापर करुण पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ग्रामसभेला जा.

१७) अंमलीपदार्थाच्या विक्रीवर निर्बंध घालण्याचा किंवा सेवनाचा नियमन करण्याचा अधिकार ग्रामसभेला जा. या अधिकाराचा वापर करुण गावात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी ग्रामसभेला असल्यामुळे ग्रामसभेला जा.

१८) गौणवनउपजेची मालकी ग्रामस्थाकडे असल्याने गौण वनउपजेचे व्यवस्थापन करुन आपला व आपल्या गांवाचा व जंगलाचा व विकास साधन्यासाठी ग्रामसभेला जा.

१९) बाजाराचे व सावकारी धंद्याचे नियमन करण्याचा ग्रामसभेला अधिकार आहे. या अधिकाराचा वापर करुन आदिवासींच्या हिताचे रक्षण करण्यासाठी ग्रामसभेला जा.

२०) आदिवासीची जिमिन बिगर आदिवासीला घेता येत नाही. या हक्काके संरक्षण करण्यासाठी ग्रामसभेला जा.

२१) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला आदिवासीच्या प्रथा, परंपरा, सामूहिक मालमत्ता, आपआपसातील तंटे सोडविण्याच्या पद्धत यांचे जतन व सवंर्धन करण्याचे अधिकार आहे. याबाबत निर्णय घेण्यासाठी ग्रामसभेला जा.

२२) लघु पाणीसाठयाचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार पंचायतीला आहे, या अधिकाराचा वापर करुण गावातील पाण्याचे नियोजन करण्यासाठी ग्रामसभेला जा.

२३) शासकीय व निमशासकीय कार्यालयाच्या कामकाजावर ग्रामसभेचे नियंत्रण असते. या कार्यालयाच्या कामकाजामध्ये सहभाग घेऊन गावाच्या विकासासाठी ग्रामसभेला जा.



# अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) ग्रामसभेची कार्यपद्धती

### १. ग्रामसभेची नोटीस

अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीची ग्रामसभा व पेसा गावाची ग्रामसभा आयोजित करावयाची असेल तर त्यासाठी पूर्ण १५ दिवसांची नोटीस काढावे लागते. पेसा क्षेत्राबाहेरील ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेसाठी हीच मुदत किमान ७ दिवसांची आहे. हा फरक ध्यानात घेण्याची गरज आहे. १५ दिवसापेक्षा कमी दिवसाची नोटीस देवून ग्रामसभा आयोजित केल्यास ती सभाच कायदेशीर ठरणार नाही. **(उदा. दि. २६ जानेवारी २०१४ रोजी ग्रामसभा आयोजित करावयाची असल्यास दिनांक १० जानेवारी २०१४ रोजी ग्रामसभेचे नोटीस काढावे लागेल, ग्रामसभेचे नोटीस काढलेला दिवस व सभेचा दिवस असे २ दिवस वगळता १५ दिवसाची नोटीस काढणे.)**

### २. ग्रामसभेच्या बैठकी खुल्या स्वरुपात घेणे

पेसा ग्रामसभेची प्रत्येक बैठक किंवा कार्यवाही जाहीर पणे आयोजित करण्यात येईल. व ग्रामसभेची बैठक बंदिस्त ईमारतीमध्ये घेण्यात येणार असली तरी, दरवाजे बंद ठेवण्याची किंवा प्रवेश बंद करण्याची कोणतीही तरतुद केली जाणार नाही.

### ३. ग्रामसभेचा कोरम

पेसा गावाच्या ग्रामसभेला गावाच्या एकूण मतदारापैकी २५% किंवा १०० या पैकी जे कमी असेल इतक्या सदस्यांची उपस्थिती आवश्यक आहे. गणपूर्ती झाल्याशिवाय ग्रामसभेचे कामकाज सुरु करता येणार नाही किंवा पुढे चालू ठेवता येणार नाही. गणपूर्ती न झाल्याने ग्रामसभा तहकूब केली असेल व त्या ऐवजी जी ग्रामसभा आयोजित केली जाईल त्या (तहकूब) सभेला देखील गणपूर्ती होणे अनिर्वाय आहे. थोडक्यात गणपूर्ती झाल्याशिवाय पेसा ग्रामसभेचे कामकाज करता येत नाही.

### ४. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांच्या संयुक्त बैठकी

पेसा नियम १३ (१) प्रत्येक ग्रामसभा तिच्या अधिकारीतेमध्ये तिचे कार्य पार पाडणे सक्षम असेल. परंतु इतर ग्रामसभांबरोबर काम करणे आवश्यक आहे, अशा प्रकरणामध्ये पंचायतीच्या अधिकारीतेअंतर्गत येणाऱ्या सर्व ग्रामसभांची एक संयुक्त बैठक बोलाविण्यात येईल.

(२) ग्रामसभांची संयुक्त बैठक ही जणूकाही त्या संबंधीत ग्रामसभा ही एकच संस्था असल्याने ग्रामसभेला लागू असलेली तरतुदीनुसार घेण्यात येईल.

(३) संयुक्त बैठकीमध्ये शक्य असेल तेथवर सर्व संमतीने निवडून ओलेली व्यक्ती त्या बैठकीच्या अध्यस्थानी असेल.

(४) संयुक्त बैठकीमध्ये प्रत्येक ग्रामसभेची किमान २५ % सदस्य किंवा प्रत्येक ग्रामसभेचे १०० सदस्य यापैकी जी कमी असेल तेवढी उपस्थिती बंधनकारक असेल. बैठकीत गणपूर्ती न झाल्यास, त्याच दिवशी पुढील बैठकीचा दिनांक निश्चित केला जाईल आणि तो सर्व ग्रामसभांना पाठविण्यात येईल.

, (५) निर्णयप्रक्रिया ही, एकल ग्रामसभेमधील निर्णय प्रक्रियेप्रमाणेच असेल.

**५. ग्रामसभेच्या बैठकीचे कार्यवाही**

पेसा नियम ४ मार्च २०१४ प्रकरण २ ग्रामसभेची रचना व कार्य तरतुद नियम ९ (१) निवडणुकीनंतर आणि प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये पहिली ग्रामसभा सरपंचांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येईल. सरपंचाच्या अनुपस्थित उप सरपंच आणि त्या दोघांच्या (सरपंच व उप सरपंच) अनुपस्थित अनुसूचीत जमातीचा सदस्या हा ग्रामसभेचा अध्यक्ष म्हणून निवडला जाईल. पंचायतीचा संरपंच किंवा सदस्य हा वरील परिस्थिती व्यतिरिक्त एरव्ही ग्रामसभेचा अध्यक्ष म्हणून काम करण्यास पात्र असणार नाही.

परंतु ज्या गावामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या १० टक्यापेक्षा कमी असेल तेथे, अनुसूचित जमातीतील नसलेल्या व्यक्तीमधून अध्यक्ष निवडता येईल.

(२) या नियमाच्या पोटनियम (१) मध्ये नमुद केलेल्या बैठकी व्यतीरीक्त ग्रामसभेच्या बैठकीसाठी अध्यक्षाची निवड शक्य तेथवर सर्व संमतीने करण्यात येईल. सर्व संमतीने न झाल्यास, त्यावर बहुमत घेण्यात येईल. केवळ अनुसूचित जमातीतील व्यक्ती हिच अध्यक्ष असेल.

(३) ग्रामसभेच्या बैठकीची गणपूर्ती एकूण सदस्यांच्या २५% किंवा १०० यापैकी जी कमी असेल त्या संख्याएवढी असेल.

(४) गणपूर्ती अभावी बैठक तहकुब करण्यात येईल. तहकुब केलेल्या बैठकीनंतर बोलावण्यात आलेल्या बैठकीत देखील गणपूर्ती आवश्यक असेल.

(५) सचीव, ग्रामसभेच्या बैठकीमध्ये मागील महिन्याची प्राप्ती व खर्च, कामगारांच्या हजेरीपट, खरेदी व विक्री यांच्या संपूर्ण अभिलेखाचे सविस्तर विवरण पत्र सादर करेल.

(६) बैठकीची समाप्ती करतांना सचिव हा ग्रामसभेने नाम निर्देशित केलेली व्यक्ती ग्रामसभेत घेण्यात आलेल्या निर्णयाचे संक्षिप्त विवरण पत्र तयार करील. ते विवरण पत्र त्या बैठकीमध्ये वाचुन दाखविण्यात येईल. विवरण पत्राच्या खरेपणाबाबत एकमत झाल्यानंतर अध्यक्ष आणि सचिव आणि लेखनिक त्यावर स्वाक्षरी करतील.

**६. निर्णय घेण्याची कार्यपद्धती**

अनुसूचित क्षेत्रातील पेसा ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत व पेसा गावाच्या ग्रामसभेत महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीत उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम २०१४ प्रकरण २ ग्रामसभेची रचना व कार्य नियम ८ (१) शक्य तेथवर ग्रामसभेचे कामकाज सर्व संमतीने चालविण्यात येईल. (२) बैठकीमध्ये कोणत्याही मुद्यावर एक मत न झाल्यास त्या मुद्यावर ग्रामसभेने तरतुदी नुसार ठरविल्याप्रमाणे घेण्यात येणाऱ्या पुढील बैठकीमध्ये चर्चा करण्यात येईल. (३) दुसऱ्या बैठकीत देखील एक मत न झाल्यास त्या बैठकीत

बहुमताच्या आधारे निर्णय घेण्यात येईल.

### ७. पेसा मंजूर ठरावाची अंमलबजावणी

ग्रामसभा गावाच्या कारभाराविषयच्या विविध पैलूंबाबतच्या आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या दृष्टीने ग्रामसभेला गरज वाटेल त्या समित्या गठीत करण्याचा अधिकार आहे. राज्य शासन देखील विविध योजना राबविण्यासाठी ग्रामसभेच्या मान्यतेने विविध समित्यांचे गठन करीत असते. या सर्व समित्या ग्रामसभेला उत्तरदायी असतात. या समित्या विकास कामाची अंमलबजावणी करु शकतील, तसेच ग्रामसभा जी कामे सोपविल ती कामे पार पाडतील. असे केल्याने ठेकेदारीला आळा बसेल व गावातील लोकांच्यामधून समित्या तयार झाल्या असल्याने कामावर देखरेख ठेवणे सुलभ होईल.

ग्रामसभेने पारित केलेल्या ठरावांची अंमलबजावणी ग्रामसभा ठरवील त्याप्रमाणे ग्रामपंचायत किंवा तीच्या समित्या, ग्रामसभेने गठीत केलेल्या स्थायी समित्या, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद किंवा शासनाचा संबंधित विभाग करील. ग्रामसभा स्वंयसेवी, सहकारी संस्था किंवा ठेकेदार यालाही काम करण्याचा आदेश देवू शकेल.

### ८. पेसा ठरावाची अंमलबजावणी करणे अनिवार्य असणे

पेसा गावाच्या ग्रामसभेने पारित केलेला ठराव हा तीच्या कार्यक्षेत्रापुरता कायदा किंवा नियमच आहे. कारण पेसा कायदा हा ७३ व्या घटनादुरुस्तीचा भाग आहे. तसेच या कायद्याने पेसा गावाला स्वंयशासनाचे अधिकार दिले आहेत, त्यामुळे त्याची अंमलबजावणी करणे अनिर्वाय आहे. ग्रामसभेचा एखादा निर्णय योग्य नाही असे एखाद्या यंत्रणेला वाटत असेल तर तीने सदरची बाब ग्रामसभेच्या निदर्शनास आणून ग्रामसभेचे मत जाणून घेणे आवश्यक आहे. ग्रामसभेचा पुर्ननिर्णय योग्य नाही असे पुनश्च यंत्रणेला वाटत असेल तर तीने सदरची बाब लेखी स्वरुपात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी पेसा कायद्यातील तरतुदीच्या आधारे निर्णय देईल.

### ९. ग्रामसभेने कामाला मंजुरी देणे, लाभधारक निवडणे बाबत अधिकार

पेसा कायद्यातील कलम ४ ई मधील तरतुदी प्रमाणे आराखडयाला मंजुरी देणे. कामांचा प्राधान्यक्रम ठरविणे, योजनेचे लाभार्थी निवडणे. कामाना भेटी देवून त्यांचे निरीक्षण करणे, कामावर झालेल्या खर्चाचे मूल्यमापन करुन त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र देणे असे अधिकार ग्रामसभेला आहेत. गाव विकास आराखडे तयार करताना किंवा त्यांची अंमलबजावणी करताना पेसा ग्रामसभेच्या या अधिकारावर अन्य प्राधिकरणाचे अतिक्रमण होणार नाही याबाबत विशेष दक्षता घेणे गरजेचे आहे.

हे कसे कराल ?

* कामाचा प्राधान्य क्रम निश्चित करताना मागणी केलेल्या सर्व कामांची यादी ग्रामसभे पुढे ठेवा व

ग्रामसभेला प्राधान्यक्रम निश्चित करण्यास विनंती करा व ग्रामसभा जो प्राधान्यक्रम निश्चित करेल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करा.

* ग्रामसभा एखादी कमिटी स्थापून तीच्या कार्यक्षेत्रातील कामाला भेटी देणे, कामाचे निरीक्षण, मूल्यमापन करणे ही कामे करु शकेल. ही कमिटी आपले कामकाज ग्रामसभेपुढे ठेवेल व ग्रामसभा त्यावर निर्णय घेईल. तसेच कामावर किती खर्च झाला असेल याची ग्रामसभा खातरजमा करुन केलेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र ग्रामसभा संबंधित यंत्रणेला देईल.

* योजनेसाठी लाभार्थी निवड करताना ग्रामसभेपुढे लाभार्थी निवडीचे निकष सांगावेत व तीला गावातील लाभधारक निवडण्याची विनंती करावी किंवा निकषाप्रमाणे जे लोक पात्र ठरतील त्या सर्वाची यादी ग्रामसभेपुढे ठेवली जाईल. ग्रामसभा त्यावर विचार करुन त्या यादीमधून लाभ धारकांची निवड करील. वरील ग्रामसभेने निवड केलेल्या लाभार्थींची ठरावामध्ये नोंद केली जाईल व त्याप्रमाणे संबंधिताना कळविले जाईल.

### १०. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला आदिवासींच्या प्रथा, परंपरा यांचे जतन संवर्धन करणे

त्यांच्या सामुहिक मालमत्तांचे व्यवस्थापन करणे या बाबत ग्रामसभेला अधिकार दिले आहेत. त्याचप्रमाणे ग्रामसभेला तंटे मिटविण्याचा अधिकार दिला आहे. या अधिकारांचा वापर करण्यासाठी जर ग्रामसभेला सुविधा निर्माण करणे गरजेचे वाटत असेल तर अशा योजना ग्रामपंचायत विकास आराखडयात समाविष्ट करता येतील. हा विषय अत्यंत महत्वाचा परंतु संवेदनशील असल्याने ग्रामसभेत त्याप्रमाणे ठराव घेवून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास कळवा व त्यानंतर पुढील कार्यवाही करा.

* विभागनिहाय व जमाती निहाय आदिवासी समाज्याच्या वेगवेगळया प्रथा, परंपरा असू शकतात. आदिवासी समाजातील वयोवृद्ध व्यक्ती, या क्षेत्रातील अभ्यासक व तज्ञ व्यक्ती यांची मदत घेवून अशा प्रथा परंपराच्या नोंदी करणे गरजेचे आहे व त्याची नोंद ग्रामसभेच्या कार्यवृत्तांतात करणे गरजेचे आहे.

* ग्रामसभेच्या मान्यतेने सर्व प्रथा, परंपरा यांचे चित्रीकरण करा. भविष्यात आदिवासींच्या कोणकोणत्या प्रथा, परंपरा आहेत याची माहिती होण्यासाठी किंवा काही कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास पुरावा म्हणून हे सर्वांना उपयोगी ठरणार आहे.

* वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया सार्वजनिक मालमत्ता असतात व त्यांचा वापर, देखभाल दुरुस्ती परंपरे प्रमाणे केली जाते.

* त्याचप्रमाणे आदिवासींना पेसा कायद्याने आपापसातील मतभेद किंवा विवाद ग्रामसभेत चर्चा करुन ग्रामसभा निर्णय घेईल त्याप्रमाणे मिटविण्याचा अधिकार दिला आहे. ग्रामसभेने यावर भारतीय संविधानाने ज्या मर्यादा घालून दिलेल्या आहेत त्याच्या आधारे ग्रामसभेत निर्णय घ्यावयाचा आहे. एखादा निर्णय अन्यायकारक आहे असे कोणाला वाटत असेल तर ती व्यक्ती मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे किंवा कोर्टाकडे दाद मागू शकते.

स्थानिक गरजेनुसार ग्रामसभेच्या ठराव घेवून एखादे काम निवडता येईल त्यावर ग्रामसभा ठरवील त्याप्रमाणे खर्च करता येईल.

### ११. जमीन अधिग्रहण व पुनर्वसन

जमीन अधिग्रहण व पुनर्वसन हा विषय आदिवासीकरिता फारच संवेदनशील आहे. कारण त्याचा अत्यंत विपरीत परिमाण आदिवासीवर होतो. पेसा कायद्यातील तरतुदीनुसार जमीन अधिग्रहण आणि पुनवर्सन करण्यापूर्वी ग्रामसभेची संमती (ळपषीाशव लेपीशपीं) घेणे अत्यावश्यक आहे. जमीन अधिग्रहण व पुनर्वसन संबंधाने आदिवासीवर जे विपरीत परिमाण झाले आहेत किंवा पुढे होतील ते दूर करण्यासाठी ग्रामसभा ग्रामपंचायत विकास आराखडयात उपाय योजना समाविष्ट करु शकेल. उदाहरणादाखल,

* जी कामे शासनाने घेतली नाहीत परंतु लोकांच्या गरजेची आहेत अशी कामे घेणे, जुन्या इमारतींची दुरुस्ती करणे.
* प्रकल्पग्रस्तांना मिळालेल्या जमिनी विकसित व अधिक उपजावू बनविणे.
* सामूहिकरीत्या जमिनीना किंवा वस्त्यांना पाणी पुरवठा करणे.
* आरोग्य, शिक्षण व इतर सेवा सुविधा निर्माण करणे, अशी कामे आराखडयात समाविष्ट करता येतील.

### १२. गौण पाणी साठे

अनुसूचित क्षेत्रातील गौण पाणीसाठे (१०० हेक्टर पर्यंत सिंचन क्षमता असलेले) ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करावेत व त्यांचे व्यवस्थापन व नियमन ग्रामसभेच्या निर्णयाप्रमाणे करावे अशी पेसा कायद्यात तरतूद आहे. या अधिकाराचा वापर करुन ग्रामसभा

* आपल्या कार्यक्षेत्रात नवीन पाणीसाठे निर्माण करणे.
* अन्य विभागामार्फत तयार झालेले पाणीसाठे हस्तांतरीत करुन घेणे,
* पिण्यासाठी, शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचे नियोजन करणे.
* मासेमारी व अन्य उपयोगासाठी लागणाऱ्या पाण्यासाठी उपाययोजना करणे,
* पाणीपट्टी आकारणे व ती वसूल करणे.
* पाणीसाठयांची देखभाल दुरुस्ती करणे.

या संबंधातील कामे ग्रामपंचायत विकास आराखडयात समावेश करु शकेल.

अनुसूचित क्षेत्रातील पावसाचे प्रमाण लक्षात घेतले तर त्या ठिकाणी आदिवासींच्या पिण्याच्या व

शेतीच्या व मासेमारीसाठी लागणाऱ्या पाण्याच्या गरजा निश्चितपणे पुऱ्या होवू शकतात अशी या भागाची भौगोलिक परीस्थिती आहे त्यामुळे अनुसूचित क्षेत्रातील प्रत्येक गावामध्ये गरजे इतके पाणीसाठे निर्माण करणे, त्यांची देखभाल दुरुस्ती करणे व वर्षभर गरजेनुसार ग्रामस्थांना पाणी मिळेल यासाठी त्याचे नियमन करणे या बाबात ग्रामसभा सदस्यांना मार्गदर्शन मिळण्याची गरज आहे. यासाठी जी कृती करावी लागेल त्याचा अंतर्भाव ग्रामविकास आराखडयात करणे गरजेचे आहे. जे पाणीसाठे अनेक गावासी निगडीत आहेत त्यांचे व्यवस्थापन ग्रामसभेच्या निर्णयाप्रमाणे पंचायत समिती व जे पाणीसाठे अनेक पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात येतात त्याचे व्यवस्थापन ग्रामसभेच्या निर्णयाप्रमाणे जिल्हा परिषद करेल.

### १३. गौण खनिजांचा लिलाव किंवा भाडेपट्टा करणे

पेसा कायद्यातील तरतुदीप्रमाणे गौण खनिजांचा लिलाव किंवा भाडेपट्टा करण्यापूर्वी ग्रामसभेची पूर्व मंजुरी घेणे बंधनकारक आहे. ग्रामसभेने नकार दिल्यास गौण खनिजांचा लिलाव किंवा भाडेपट्टा महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करण्याबाबत) नियम २०१४ बाब ३२(८) नुसार करता येणार नाही. गौण खनिजांचा अतिरिक्त उपसा झाल्यास त्याचा विपरीत परिमाण पर्यावरणावर व आदिवासींच्या जीवन शैलीवर खूप मोठया प्रमाणात होतो. हे टाळण्यासाठी ग्रामसभा खालील पर्यायांचा विचार करुन निर्णय घेवू शकेल.

* पेसा कायद्यातील तरतुदी ध्यानात घेता ग्रामसभेचे नकार दिल्यास जिल्हाधिकाऱ्यास लिलाव किंवा भाडेपट्टा करता येणार नाही. किंवा ग्रामसभेने सशर्त परवानगी दिली असेल तर ज्या अटीशर्ती घातल्या असतील त्याचा विचार करुन जिल्हाधिकारी लिलाव किंवा भाडेपट्टा करण्यास परवानगी देईल.

* स्थानिक आदिवासींचे स्वंयसहायता गट किंवा सेवा/सहकारी संस्था किंवा ग्रामपंचायतीने लिलाव घेतल्यास किंवा गौण खनिजांचा भाडेपट्टा केल्यास गावाचे त्यावर नियंत्रण राहू शकेल व गावासाठी हा उत्पन्नाचा नवीन स्त्रोत ठरु शकतो.

* गौण खनिजामुळे गावाचे किंवा पर्यावरणाचे झालेले नुकसान भरुन काढण्यासाठी ग्रामसभेला ग्रामपंचायत आराखडयात कामे सुचवता येतील.

* खोदाईमुळे दगडखाण निर्माण झाली असेल तर कंपाऊंड घालून ती सुरक्षित करता येईल व त्या दगड खाणीच्या खडयात पाणी साठवून त्याचा पिण्यासाठी, शेतीसाठी, मासेमारीसाठी उपयोग करता येईल.

* तलावाचे सुशोभीकरण करुन करमणूकीच्या सुविधा निर्माण करता येतील.

* खड्डे भरुन ती जागा उपयुक्त बनवता येईल व गरजे प्रमाणे त्या जागेचा वापर करता येईल किंवा त्या ठिकाणी नवीन वृक्ष लागवड करुन नर्सरी किंवा मुलासाठी बगीचा तयार येईल.

वरील कामकाजा सबंधातील कामे पेसा ग्रामसभा ग्रामपंचायत विकास आराखडयात समाविष्ट करु

शकेल.

**१४. अंमली पदार्थाच्या सेवनावर निर्बंध किंवा त्याचे नियमन करणे बाबत.**

पेसा कायद्याने अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला अंमली पदार्थांच्या सेवनावर निर्बंध घालणे किंवा त्याचे नियमन करण्याचा अधिकार दिला आहे. या बाबत स्थानिक परिस्थितीनुसार ग्रामसभा निर्णय घेवून त्याचा समावेश ग्रामपंचायत विकास आराखडयात करु शकते.

(क) आदिवासींना त्यांच्या स्वतःच्या वापराकरीता स्थानिक दारु बनवण्यास दिलेली सुट पूर्णतः थांबवता येईल. किंवा गावामध्ये तिचे उत्पादन, विक्री, वितरण, सेवन वा साठा करण्यावर कोणत्याही प्रकारची बंदी आणता येईल.

(ख) एखाद्या दुकानातुन किंवा अन्य कोणत्याही मार्गाने कोणत्याही प्रकारच्या मादक पदार्थाची विक्री थांबविण्याच्या सुचना देता येतील. परंतु या सुचना तात्काळ किंवा करार समाप्तीनंतर लगेचच अमलात येतील.

(ग) कोणत्याही प्रकारचा मादक पदार्थ गावाच्या प्रदेशामध्ये आणण्यास अथवा प्रदेशातुन बाहेर घेऊन जाण्यास बंदील घालता येईल.

(घ) कोणत्याही ठिकाणी मादक पदार्थाच्या साठ्यास प्रतिबंध करता येईल. किंवा त्यावर मर्यादा घालता येईल.

(ड) तिच्या गावाच्या प्रदेशामध्ये दारुच्या अथवा अन्य मादक पदार्थाच्या वापरावर संपूर्णपणे बंदी घालता येईल किंवा कोणताही निर्बंध लादता येईल.

(च) गावाच्या प्रदेशामध्ये किंवा बाजारात दरु बनवण्यामध्ये वापरली जाणारी मोहाची फुले (महुआ), काकवी (जॅगरी) इत्यादींच्या विक्रीस मनाई करता येईल.

(छ) ताडीचा, अथवा अन्य कोणत्याही स्थानिक मादक पदार्थाचा वापर तात्काळ सुचना देऊन बंद करता येईल.

**१५. गौण वनउपजांची मालकी व त्यांची विक्री किंवा विनीयोग करणे.**

पेसा कायद्याने अनुसूचित क्षेत्रातील जंगलातील गौण वन उपजेची मालकी गावाला देण्यात आली आहे. वन हक्क कायद्याने देखील असेच अधिकार गावाला दिले आहेत याचा अर्थ असा आहे की गौण उपज गोळा करणे, साठविणे किंवा तीच्यावर प्रक्रिया करुन तीचा वापर करणे किंवा तीची विक्री करणे याबाबतचे सर्व अधिकार आता ग्रामसभेला प्राप्त झाले आहेत.

जंगलामध्ये विविध प्रकारची वनउपज उपलब्ध आहे. तसेच तिचा वापर 'खाद्य, औषध, इंधन,

गृहोपयोगी वस्तू तयार करणे, बिडी तयार करण्यासाठी तेंदू पानाचा वापर करणे, तेल तयार करणे, रंग तयार करणे, मध, रेशीम, लाख गोळा करुन त्यांचा विविध कारणासाठी वापर करणे, असे या वन उपजेंचे प्रकारानिहाय उपयोग ठरले आहेत. यातून आदिवासींना खाद्य व गरजेच्या वस्तू मिळत असतात तसेच यामधून आदिवासींना रोजगार मिळतो व त्यांना आर्थिक उन्नती साधता येते. अशा अनेक कारणामुळे गौण वन उपज आदिवासी जीवनामध्ये मोलाची कामगिरी बजावते. गौण उपजेपासून आदिवासींना निरंतर लाभ मिळत रहावा यासाठी ग्रामसभा प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन खालील बाबींचा विचार करुन त्या संबंधातील कामांचा ग्रामविकास आराखडयात समावेश करु शकेल.

* वन उपज गोळा करणे. तिची प्रतवारी करणे व साठवणूक करणे.
* गरजेप्रमाणे वन उपजेवर विविध प्रक्रिया करुन तीचे मुल्यवर्धीकरण करणे.
* वन उपजेची वाहतूक करणे व तिची विक्री करणे
* वृक्ष लागवड करणे, त्यांचे जतन व संवर्धन करणे.
* आदिवासीकरिता प्रशिक्षण व कौशल्य वृधीकरण केंद्रे स्थापन करणे व त्यांना प्रशिक्षण देणे.
* वरीलप्रमाणे कामकाज करता यावे यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे.

## १६. आदिवासींच्या जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतर रोखणे व अशी हस्तांतरित झालेली जमीन मुळ मालकाला परत करणे

पेसा कायद्याने अनुसूचित क्षेत्रातीहल गावाच्या ग्रामसभेला आदिवासीच्या जमिनीचे हस्तांतर रोखण्यासाठी व ज्या आदिवासीच्या जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतर झाले असेल तर ती जमीन मुळ मालकाला परत करण्याबाबतचे अधिकार दिले आहेत. ग्रामसभेने असा ठराव पारित करुन जिल्हाधिकाऱ्याला कळविल्यास त्याप्रमाणे तो बेकायदेशीरपणे हस्तांतर झालेली जमीन मूळ आदिवासी मालकाला परत करील तसेच या योगे आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतरास प्रतिबंध करील अशी पेसा कायद्यातील तरतूद आहे.

आदिवासींचे जीवन जमीन, जल व जंगल यांचेवर अवलंबून आहे. त्यामुळे त्यांच्या जमिनीचे अन्य लोकांना हस्तांतर झाल्यास त्यांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होतो. सबब ग्रामविकास आराखडयात ग्रामसभा अशा बाबीचा समावेश करु शकेल की त्यामुळे जमिनीचे हस्तांतर होणार नाही किंवा हस्तांतरीत झालेल्या जमिनी मूळ आदिवासी मालकाला परत केल्या जातील. उदाहरणादाखल,

* आदिवासींकरिता रोजगाराच्या योजना हाती घेणे.
* आदिवासीच्या आर्थिक गरजा भागविल्या जातील यासाठी उपाययोजना करणे.
* जमीन हस्तांतर प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे.

वरील प्रकारच्या योजना ग्रामसभेला आराखडयात समाविष्ट करता येतील.

**१७. बाजाराची स्थापना व त्याचे व्यवस्थापन करणे**

अनुसूचितक्षेत्रातील गावांच्या ग्रामसभाना गावात बाजाराची स्थापना करणे बाजार स्थापनेस मान्यता देणे त्याच्यावर नियंत्रण ठेवण्यास व त्याचे व्यवस्थापन करण्यास सक्षम असेल. :

(क) बाजारातील दुकानदार व ग्राहक यांना पाणी, तात्पुरता निवारा व इतर भौतिक सुविधा उपलब्ध करुन देणे.

(ख) बाजारात हानिकारक वस्तुंची आवक व विक्री यांना प्रतिबंध करणे.

(ग) व्यवहारांमध्ये वजन, माप व पैशाचे प्रदान चोखपणे केले जात आहे व त्यात कोणत्याही प्रकारचे शोसन केले जात नाही याची सुनिश्चिती करणे.

(घ) आकारण्यात येणाऱ्या दरांविषयी माहिती मिळविणे व तिची देवाणघेवाण करणे.

(ड) दराच्या बाबतीत फसवणूक किंवा चुकीची माहिती देणे इत्यादी सर्व अनुचित प्रथांना प्रतिबंध करणे.

(च) बाजारात किंवा त्यांच्या सभोवतालच्या क्षेत्रात जुगार, बेटींग, सट्टे लावणे, कोंबेड्यांच्या झुजी यासारख्या गोष्टींना प्रतिबंध करणे.

(छ) लहान विक्रेत्या व्यतिरिक्त बाजारातील दुकानदारांवर कर लादणे यासाठी पंचायती सल्ला देणे.

(ज) वस्तुनिष्ठ तत्वांच्या आधारे लहान विक्रेता म्हणून ती कोणती व्यक्ती पात्र असेल ते ठरविणे.

वरील प्रकारची कामे ग्रामपंचायत विकास आराखडयात ग्रामसभा समाविष्ट करु शकेल.

**१८. अनुसूचित क्षेत्रातील सावकारीवर नियंत्रण ठेवणे.**

पेसा नियम १० (१) ग्रामसभा गावाच्या कारभाराविषयीच्या विविध पैलुबाबतच्या आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी ग्रामसभेस तिच्या सदस्यांमधून एक कर्ज नियंत्रण समिती गटीत करता येईल.

(२) ही, समिती लायसनप्राप्त सावकारांसह बिगर शासकीय सावकारांकडून होणाऱ्या शोषणाच्या, व्याजखोरीच्या अवैद्य सावकारी किंवा अग्रीम या प्रसंगाची तपासणी करु शकेल.

(३) कोणतीही अवैधता आढळणाऱ्या प्रसंगी, ऋण नियंत्रण समिती, तिचा अहवाल, शिफारशीसह कारवाईकरीता समुचित प्राधिकरणाकडे पाठवील.

* आदिवासींना खाजगी सावकाराकडून व्याजाने पैसे घेण्याची गरज भासणार नाही या करिता गावात रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची कामे हाती घेता येतील किंवा आर्थिक उन्नतीच्या योजना राबवता येतील.

* सावकाराकडून आदिवासींची फसवणूक होणार नाही याकरीता ग्राम सभेत सावकाराने केलेल्या कामाचा आढावा घेता येईल.
* स्वंयसहायता गटाची निर्मिती करुन त्यांच्या मार्फत आर्थिक गरजा भागविता येतील.
* स्थानिक गरजेनुसार अन्य काही विशेष उपक्रम ग्रामविकास आराखडयात ग्रामसभेला समावेश करता येतील.

**१९. सामाजिक व आर्थिक योजना राबविणाऱ्या कार्यालयावर व संस्थावर नियंत्रण ठेवणे**

पेसा कायद्यातील तरतुदी प्रमाणे सामाजिक व आर्थिक योजना राबविणाऱ्या कार्यालयावर व संस्थावर व आदिवासी उपाययोजनेच्या अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला प्राप्त झाला आहे. या अधिकारांचा वापर करुन अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा तीच्या कार्यक्षेत्रातील सर्व कामांना भेटी देवून कामाचे निरीक्षण करणे, त्यांची गुणवत्ता तपासणे, कामे नियमानुसारच होत आहेत याची खातरजमा करणे अशी कामे हाती घेवू शकते व त्यांचा समावेश ग्रामविकास आराखडयात करु शकते.

**२०. पेसा गावाच्या कार्यक्षेत्रातील नैसर्गिक साधनसंपत्ती बाबत ग्रामसभेने संरक्षक उपाययोजना करणे.**

पेसा नियम २० (१) स्थानिक परंपरेनुसार केद्र व राज्य सरकारच्या कायद्याच्या आशयानुसार पाणी, वन, जमीन व खनिज यांसह ग्रामसभेच्या क्षेत्रात स्थित नैसर्गिक साधनसंपत्ती तसेच जिच्यावर त्या ग्रामसभेचा परंपरागत अधिकार आहे. अशी साधनसंपत्ती यांबाबत संरक्षक उपाययोजना करणे आणि त्याचे जतन करणे याकरीता ग्रामसभा सक्षम आहे. कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी ग्रामसभेला त्यांच्या व्यवस्थापनामध्ये क्रियाशील भुमिका बजावता येईल.

* लोकांमध्ये जाणीवजागृती निर्माण करण्याचे उपक्रम हाती घेणे.
* वृक्ष लागवड व जल भूमी संधारणाचे उपक्रम घेणे.
* जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध कामे करणे.
* पीकपाण्याचे नियोजन करणे.
* नागरिकासाठी उद्याने, औषधी वनस्पतीची लागवड करणे.
* पर्यटनस्थळे विकसित करणे.

**२१. पेसा व्यतरिक्त अन्य कायद्याने प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन ती कामे हाती घेणे**

पेसा गावाची ग्रामसभा तीला पेसा कायद्याप्रमाणेच अन्य कायद्याने प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन ग्रामपंचायत विकास आराखडयात विविध कामांचा समावेश करु शकेल.

* म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५
* वन हक्क कायदा, २००६
* जैवविविधता कायदा, २००२
* पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६

**वन हक्क कायदा २००६ आणि ग्रामपंचायत विकास आराखडा**

पेसा कायद्या प्रमाणेच वन हक्क कायदा देखील आदिवासींच्या दृष्टीकोनातून एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्याची अंमलबजावणी योग्यप्रकारे झाल्यास जंगल आणि आदिवासी या दोहोच्या विकासाला चालना मिळणार आहे.

**अनेकविध कामांचा समावेश ग्रामपंचायत विकास आराखडयात करता येईल. उदाहरादाखल,**

* आदिवासींना व पारंपारिक वन निवासींना वन कायद्याने मिळालेल्या जमिनी अधिक विकसित व उपजाऊ बनविण्यासाठी विविध कामे हाती घेता येतील.
* सामुहिक विहिरी किंवा तलाव निर्माण करुन त्या जमिनींना पाणी देण्याची सोय करता येईल.
* पर्यावरणाला पूरक परंतु उपयुक्त अशा फळ झाडांची लागवड करता येईल.
* सामुहिक हक्काच्या वन जमिनीवर मृदु व जल संधारणाची कामे घेता येतील.
* या जमिनीवर घरगुती वापरासाठी तसेच इंधनासाठी लागणाऱ्या झाडांची किंवा जनावरासाठी उपयुक्त असलेल्या गवताची लागवड करुन गावाच्या गरजा गावातच भागवता येतील. यामुळे वन सुरक्षित राहील व गावाच्या गरजा देखील भागतील.
* वन हक्क कायद्याने वनात निवास करण्याचा अधिकार दिला आहे. त्याचप्रमाणे केंद्र शासनाने वन ग्रामाना कायदेशीर मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. वनातील अशा वस्त्यांना रस्ता, पाणी, शाळा, अंगणवाडी किंवा अन्य सुविधा देणाऱ्या योजना हाती घेता येतील.

वन हक्क कायद्याने लोकांना उपयुक्त असणारी १५ प्रकारची विकासाची कामे गावात राबविण्याचा अधिकार दिला आहे. त्यामध्ये,

* दळणवळण सुलभ होण्यासाठी रस्ता तयार करणे,
* पाणी साठे तयार करणे, बंधारे, तळी निर्माण करणे,
* पाण्याचे पाट तयार करणे,
* पाण्याची टाकी उभारणे,

* पिण्याच्या पाण्यासाठी जल वाहिनी टाकणे,
* गावात दूरध्वनीची सोय व गावाचे विद्युतीकरण करण्यासाठी वन जमिनीत पोल उभारणे,
* मुला मुलींच्या शिक्षणासाठी शाळा बांधणे,
* अंगणवाडी बांधणे,
* वन जमिनीवर आरोग्यकेंद्रे तयार करणे,
* प्रशिक्षण केंद्रे उभारणे,
* सांस्कृतिक केंद्रे तयार करणे,
* गोडाऊन उभारणे,
* दफनभूमी भूमीसाठी जागा,
* स्वस्त धान्य वितरण केंद्र उभारणे,
* अपांरपारिक उर्जा साधने,

या संबंधातील विविध कामे असून ती प्रत्येक गावाची गरज आहे. वन हक्क कायद्याने मंजुरी देलेल्या कामांचा समावेश विकास आराखडयात करता येईल व त्या सुविधा ग्रामसभा कोषाच्या निधीतून गावात निर्माण करता येतील.

या बरोबरच वनाचे जतन व संवर्धन करणे वनातील विविध प्रकारच्या वनस्पतींचे तसेच वनातील वन्य प्राण्यांचे रक्षण करणे याची जबाबदारी वन कायद्याने ग्रामसभेवर सोपविली आहे. हे काम पार पाडण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम हाती घ्यावे लागतील तसेच या बाबतीत सर्वांच्यामध्ये जाणीव जागृती निर्माण करावी लागेल. सध्याची परिस्थिती पाहता हे काम करणे हे वनाच्या व वन्य प्राण्यांच्या तसेच आदिवासींच्या अत्यंत हिताचे असून त्याचा लाभ अन्य लोकांना देखील होणार आहे. हे करण्यासाठी स्थानिक परिस्थिती नुसार विविध प्रकारची कामे घेता येतील. उदाहरणादाखल,

* जंगलात जल भूमी संधारणाची कामे हाती घेणे.
* नवीन वृक्ष लागवड करणे.
* नवीन लागवड केलेल्या झाडांचे जतन करणे.
* रोप वाटिका तयार करणे.
* वन्य प्राणी यांचे जतन व संवर्धन करणे व त्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करणे.
* जैवविविधता राखणारे कार्यक्रम हाती घेणे.

* गौण वन उपज वाढीसाठी विविध उपक्रम हाती घेणे, तीचे मूल्यवर्धन करण्याचे उपक्रम हाती घेणे.
* इंधनासाठी लागणारा लाकूड फाटा, जनावरांसाठी चारा, घरगुती वापरासाठी लागणारे लाकूड यासाठी वेगळे उपक्रम राबविणे जेणेकरुन जंगलाचा नाश होणार नाही अशी कामे हाती घेणे.

वर दिलेली यादी वन हक्क कायद्यातील तरतुदीप्रमाणे प्रातिनिधिक स्वरुपात देण्यात आली आहे. याबाबत ग्रामसभेला स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा अधिकार आहे.

पेसा क्षेत्रातील गावे दुर्गम व अविकसित भागात आहेत तसेच ही गावे आदिवासी बहुल आहेत. जो पर्यंत आदिवासींना आपण त्यांना त्यांच्या बाबतीत असलेल्या विकास योजना व पेसा कायदा तसेच अन्य उपयुक्त कायदे यांची त्यांना माहिती देत नाही व त्यांना या संबंधाने नियमित प्रशिक्षण देण्याची सोय करत नाही व ग्रामसभेला व तिने रचना केलेल्या समित्यांना सहाय्य करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करीत नाही तोपर्यंत या कायद्यांच्या अंमलबजावणीस चालना मिळणार नाही व त्यांच्या विकासाला गती मिळणार नाही. याकरिता ग्रामपंचायत आराखडयात या प्रयोजनाकरिता तरतूद करणे आवश्यक आहे. याबाबत शासन स्तरावरुन देखील मार्गदर्शन सूचना काढण्याची गरज आहे.

पेसा कायद्याने आणि वन हक्क कायद्याने ग्रामसभेला जे अधिकार दिले आहेत त्या अधिकारांचा वापर करुन ग्रामपंचायत विकास आराखडे कसे तयार करता येतील व त्या योगे आदिवासींच्या विकासाला आणि अनुसूचित क्षेत्रातील पेसा गावांच्या विकासाला अशी चालना देता येईल याची माहीती वर दिली आहे. तसेच हे करण्यासाठी नियमित प्रशिक्षण व सहाय्यासाठी मनुष्यबळ लागणार असल्याने त्याचाही अंतर्भाव या मध्ये असणे गरजेचे वाटत असल्याने त्याबाबतही काय करता येईल याची माहिती दिली आहे. वर देण्यात आलेली कामाची माहिती ही प्रातिनिधिक स्वरुपात आहे. गावाच्या गरजेनुसार अन्य कामांचा समावेश करण्याचा ग्रामसभेला अधिकार आहे.



# पेसा संबंधीत शासन अधिनियम / अधिसुचना

भारत सरकार

विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय

# पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६

(सन १९९६ चा अधिनियम क्रमांक ४०)

(दिनांक २१ एप्रिल, २००३ रोजी यथाविद्यमान)

# The Provisions of the Panchayats (Extension to the Scheduled Areas) Act, 1996

(Act No. 40 of 1996)

(As in force on the 21st April, 2003)

संचालक, मुद्रण व लेखन लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**प्राक्कथन**

या आवृत्तीत, दिनांक २१ एप्रिल, २००३ रोजी यथाविद्यमान असलेला दि प्रोव्हिजन्स ऑफ दि पंचायतस् (एक्सटेन्शन टू दि शेड्यूल्ड एरियास) ॲक्ट, १९९६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक ३, दिनांक २ ऑक्टोबर, २००३ यात पृष्ठ १६१ ते १६२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रिय विधि) अधिनियम १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २ ऑगस्ट, २००३

डॉ. सुभाष चंद्र जैन
सचिव, भारत सरकार

**PREFACE**

This edition of the The Provisions of the Panchayats (Extension to the Scheduled Areas) Act, 1996 as on the 21st April, 2003 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in Gazette of India, Extraordinary, Part XII, Section 1, No. 3, Volume 12, dated 2nd October, 2003 on pages 161 to 162.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (a) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of the Act in Marathi.

New Delhi,
Dated 2nd October, 2003.

Dr. SUBHASH C. JAIN
Secretary to the Government of India.

## पंचायतीसंबंधी उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६

### कलमांचा क्रम


कलमे

१. संक्षिप्त नाव

२. व्याख्या

३. संविधानाच्या भाग नऊचा विस्तार

४. संविधानाच्या भाग नऊचे अपवाद व आपरिवर्तन

५. विद्यमान कायदे व पंचायती पुढे चालू राहणे.

## पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६

**(१९९६ चा अधिनियम क्रमांक ४०)**

**(२१ एप्रिल, २००३ रोजी यथाविद्यमान)**

(२४ डिसेंबर, १९९६)

**संविधानाच्या भाग नऊमधील, पंचायतींशी संबंधित असलेल्या उपबंधांचा विस्तार अनुसूचित क्षेत्रांवर करण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम**

भारतीय गणराज्याच्या सत्तचाळिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :

१. या अधिनियमात, "पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, संक्षिप्त नाव, १९९६" असे म्हणावे.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर "अनुसूचित क्षेत्रे" याचा अर्थ व्याख्या, संविधानाच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निर्देशिलेली अनुसूचित क्षेत्रे, असा आहे.

**संविधानाच्या भाग नऊचा विस्तार**

३. संविधानाच्या भाग नऊमधील पंचायतीशी संबंधित असलेल्या उपबंधाचा विस्तार कलम ४ मध्ये उपबंधित केलेले अपवाद व अपरिवर्तने यांना अधीन राहून याद्वारे अनुसूचित क्षेत्रांवर करण्यात येत आहे.

**संविधानाच्या भाग नऊचे अपवाद व अपरिवर्तन.**

४. संविधानाच्या भाग नऊमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही विधानमंडळ त्या भागाअन्वये, पुढीलपैकी कोणत्याही बाबींशी विसंगत असेल असा कोणताही कायदा करणार नाही; त्या बाबी पुढीलप्रमाणे :

(क) पंचायतीसंबंधात करता येईल असे कोणतेही राज्य विधि विधान रूढीगत कायदा, सामाजिक व धार्मिक प्रथा आणि सामूहिक साधनसंपत्तीच्या परंपरागत व्यवस्थापनाच्या प्रथा यांच्या सुसंगत असे असेल;

(ख) गाव हे सामान्यतः एक वस्ती किंवा वस्त्यांचा गट मिळून किंवा एक पाडा किंवा पाड्यांचा गट मिळून बनलेले असेल व त्यात एक समाज असून तो आपल्या परंपरांच्या व रुढींच्या अनुसार आपले व्यवहार चालीवत असेल;

(ग) प्रत्येक गावात, ग्रामपातळीवरील पंचायतीसाठी असलेल्या मतदार

याद्यांमध्ये ज्यांची नांवे अंतर्भूत केलेली आहेत अशा व्यक्तींचा समावेश असलेली ग्रामसभा असेल;

(घ) प्रत्येक ग्रामसभा, लोकांच्या परंपरा व रुढी, त्यांची सांस्कृतिक अस्मिता, सामूहिक साधनसंपत्ती आणि तंटे मिटवण्याची रुढीगत पद्धती सुरक्षित ठेवण्यास व जतन करण्यास सक्षम असेल;

(ङ) प्रत्येक ग्रामपसभा

(एक) ग्रामपातळीवर पंचायतीकडून सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांच्या कार्यान्वियाचे काम सुरु होण्यापूर्वी अशा योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांना मान्यता देईल.

(दोन) दारिद्र्य निर्मूलनाच्या व इतर कार्यक्रमाखाली कोणत्या व्यक्ती लाभाधिकारी आहेत हे ओळखण्यास किंवा त्यांची निवड करण्यास जबाबदार असेल;

(च) ग्रामपातळीवरील प्रत्येक पंचायतीला, खंड (ङ) मध्ये निर्देश केलेल्या योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांच्यासाठी त्या पंचायतीने केलेल्या निधीच्या वापराचे प्रमाणपत्र ग्रामसभेकडून मिळवावे लागेल;

(छ) प्रत्येक पंचायतीमधील अनुसूचित क्षेत्रातील जागांचे आरक्षण हे, त्या पंचातीमधील ज्या जमातींसाठी संविधानाच्या भाग नऊखाली आरक्षण द्यावयाचे योजलेले असेल त्या जमातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुरुप असेल

परंतु, अनुसूचित जनजातींसाठी असलेले आरक्षण जागांच्या एकूण संख्येच्या एक द्वितीयांशापेक्षा कमी असणार नाही.

परंतु आणखी असे की, सर्व पातळीवरील पंचायतीच्या सभापतींच्या सर्व जागा अनुसूचित जनजातींसाठी राखून ठेवण्यात येतील;

(ज) मध्यम पातळीवरील पंचायतीमध्ये किंवा जिल्हापातळीवरील पंचायतीमध्ये ज्यांचे प्रतिनिधित्व नसेल अशा अनुसूचित जनजातीमधील व्यक्तींना राज्य शासन नामनिर्देशित करू शकेल;

परंतु, असे नामनिर्देशन, त्या पंचायतीमधून निवडून द्यावयाच्या एकूण सदस्यांच्या संख्येच्या एक-दशांशापेक्षा अधिक असणार नाही;

(झ) अनुसूचित क्षेत्रामध्ये विकास प्रकल्पांसाठी जमीन संपादन करण्यापूर्वी आणि अनुसूचित क्षेत्रातील अशा प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या व्यक्तीची पुनर्वसाहत किंवा त्यांचे पुनर्वसन करण्यापूर्वी ग्रामसभेचा किंवा समुचित पातळीवरील पंचायतीचा सल्ला घेण्यात येईल;

अनुसूचित क्षेत्रातील प्रकल्पांचे प्रत्यक्ष नियोजन आणि कार्यान्वयन यांचा समन्वय राज्य पातळीवर साधण्यात येईल;

(ण) अनुसूचित क्षेत्रातील लहान जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन करण्याचे काम समुचित पातळीवरील पंचायतीकडे सोपविण्यात येईल;

(ट) अनुसूचित क्षेत्रामध्ये गौण खनिजांसाठी पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा देण्यापूर्वी समुचित पातळीवरील ग्रामसभेच्या किंवा पंचायतींच्या शिफारशी अनिवार्य करण्यात येतील;

(ठ) गौण खनिजांचे उत्खननाद्वारे समुपयोजना करण्याकरिता सवलत देण्यापूर्वी समुचित पातळीवरील ग्रामसभेच्या किंवा पंचायतींच्या पूर्वशिफारशी अनिवार्य करण्यात येतील;

(ड) अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींना, स्वयंशासनाच्या संस्था म्हणून काम करणे त्यांना शक्य व्हावे यासाठी आवश्यक असतील असे अधिकार व प्राधिकार देतेवेळी राज्य विधानमंडळ, समुचित स्तरावरील पंचायती व ग्रामसभा यांना विनिर्देशकपूर्वक

(एक) मादक द्रव्यांची विक्री व सेवन यांना मनाई करण्याचा किंवा त्यांचे विनियमन करण्याचा किंवा त्यावर निर्बंध घालण्याचा अधिकार;

(दोन) गौण वन-उत्पादनाची मालकी;

(तीन) अनुसूचित क्षेत्रातील जमिनीच्या अन्य संक्रमणास प्रतिबंध करण्याची आणि अनुसूचित जनजातींच्या अवैधरित्या अन्य संक्रमित झालेल्या कोणत्याही जमिनींच्या पुनःस्थापनासाठी समुचित कृती करण्याचा अधिकार;

(चार) ग्रामीण बाजारपेठांच्या मग त्या कोणत्याही नावाने ओळखल्या जावोत, व्यवस्थापनाचा अधिकार;

(पाच) अनुसूचित जनजाती सावकारी करण्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार;

(सहा) सर्व सामाजिक प्रभागांमधील संस्था आणि कार्यकर्ते यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार; आणि

(सात) जनजाती उप-योजनांसह स्थानिक योजना आणि अशा योजनांसाठी लागणारी साधनसंपत्ती यावरील नियंत्रणाचा अधिकार;

देण्यात आले आहेत, हे सुनिश्चित करील;

(ढ) स्वयंशासनाच्या संस्था म्हणून कामे पार पाडणे पंचायतींना शक्य व्हावे यासाठी आवश्यक असतील असे अधिकार व प्राधिकार त्यांना देणाऱ्या राज्याच्या विधी विधानामध्ये, उच्च पातळीवरील पंचायती या निम्न पातळीवरील कोणत्याही पंचायतीचे किंवा ग्रामसभेचे अधिकार व प्राधिकार धारण करीत नाहीत, हे सुनिश्चित करण्यासाठी संरक्षक उपाययोजनांचा अंतर्भाव असेल;

(ण) राज्य विधानमंडळ, अनुसूचित क्षेत्रातील जिल्हा स्तरावरील पंचायतीमध्ये प्रशासकीय व्यवस्था करतेवेळी संविधानाच्या सहाव्या अनुसूचीच्या पद्धतीचे अनुपालन करण्याचा प्रयत्न करील.

५. या अधिनियमाद्वारे देण्यात आलेली सूट व करण्यात आलेले फेरबदल यांसह संविधानाच्या भाग नऊमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमास राष्ट्रपतींची संमती मिळाल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास अनुसूचित क्षेत्रामध्ये अंमलात असलेल्या, पंचायतीशी संबंधित कोणत्याही कायद्यातील भाग नऊच्या उपबंधांशी विसंगत असलेला कोणताही उपबंध अशा सूट व फेरबदल यासह, सक्षम विधानमंडळाद्वारे किंवा इतर सक्षम प्राधिकरणाद्वारे त्यांचे विशोधन किंवा निरसन करण्यात येईपर्यंत किंवा या अधिनिमास

विद्यमान कायदे व पंचायती पुढे चालू राहणे

राष्ट्रपतींची संमती मिळाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी समाप्त होईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील;

परंतु अशा दिनांकाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या सर्व पंचायती, त्या राज्याच्या विधानसभेद्वारे किंवा जेथे विधानपरिषद आहे अशा राज्याच्या बाबतींत त्या राज्याच्या विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांद्वारे तशा आशयाचा ठराव मंजूर करुन अधिक विसर्जित केलेल्या असतील हे खेरीजकरुन, त्यांचा कालावधीही समाप्त होईपर्यंत चालू राहतील.

RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2014–16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक १३२ (२)] मंगळवार, मार्च ४, २०१४/फाल्गुन १३, शके १९३५ [पृष्ठे ३०, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४००००१.

दिनांक ४ मार्च २०१४.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम.**

क्रमांक. पीआरआय.२०१०/प्र.क्र.१३०/पं.रा-२.—ज्याअर्थी, संसदेने, संविधान (त्र्याहत्तरावी सुधारणा) अधिनियमाद्वारे समाविष्ट केल्याप्रमाणे, भारतीय संविधानाच्या भाग नऊ च्या तरतुदी ह्या, पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ (१९९६ चा ४०) अधिनियमित करून लागू केल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त केंद्रीय अधिनियमाच्या अनुरुप, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाने, मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २००३ (२००३ चा २७) अधिनियमित करून आणि वेळोवेळी इतर सुधारणा अधिनियम अधिनियमित करून त्याद्वारे, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) यामध्ये अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा आणि पंचायत यांसाठी विशेष तरतुदी असलेले प्रकरण तीन-अ समाविष्ट केले आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात उक्त सुधारणा समाविष्ट केल्यानंतर त्याद्वारे, अनुसूचित क्षेत्रातील लोकांच्या परंपरा व रुढी, त्याची सांस्कृतिक ओळख, सामूहिक साधनसंपत्ती आणि तंटा निवारणाची रुढ पद्धती आणि गौण वनोत्पादनावरील मालकी, इत्यादींचे रक्षण व जतन करण्यासाठी अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना आणि पंचायतींना अधिकार प्रदान केले आहेत.

आणि त्याअर्थी, स्वयंशासनाला चालना देणा-या मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २००३ याची अमंलबजावणी करून त्याद्वारे, अनुसूचित क्षेत्रात राहणा-या लोकांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याचे आणि त्या प्रयोजनार्थ, त्यासंबंधीचे प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चिती करण्याचे मुख्य कार्य ग्रामसभांना देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) याच्या कलम १७६ च्या पोटकलम (२) चा खंड (सत्तेचाळीस) व प्रकरण तीन-अ मधील कलमे ५४अ, ५४ब, ५४क, ५४ड, कलम ५७ च्या पोटकलम (२) चा खंड (फ अ) आणि कलम १५३ ब यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त अधिनियमाच्या कलम १७६ च्या पोटकलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे अगोदरच प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ** :—(१) या नियमांना, महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करण्याबाबत) नियम, २०१४ असे म्हणावे.

(२) ते, जेथे अधिनियम अंमलात आहे राज्यातील अशा, सर्व अनुसूचित क्षेत्रांना लागू असेल.

**२. व्याख्या :**

(१) या नियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) असा आहे.

(ख) " प्रपत्र " याचा अर्थ नियामांसोबत जोडलेले प्रपत्र

(ग) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(घ) " ग्रामसभा " याचा अर्थ, ग्रामस्तरावरील पंचायतीच्या मतदार यादीमध्ये ज्यांची नावे समाविष्ट केलेली आहेत अशा सर्व व्यक्तींची मिळून बनलेली, अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा, असा आहे.

(ङ) " सचिव " याचा अर्थ ग्राम पंचायत अधिनियमाच्या कलम ६० अन्वये नियुक्त केलेला किंवा नियुक्त केला आहे असे मानला जाणारा सचिव.

(च) " राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य आहे.

(२) या नियमामध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, महाराष्ट्र जमीन सुधारणा योजना अधिनियम (१९४२ चा २८); महाराष्ट्र सावकारी नियमन अध्यादेश, २०१४, (२०१४ चा अध्यादेश क्रमांक १) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा २५) ; महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२); महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३); महाराष्ट्राचा मासेमारीबाबत अधिनियम १९६० (१९६१ चा महा-१); महाराष्ट औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा-३); महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा-५). महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा.४१); महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) अधिनियम, १९६९ (१९६९ चा महा.५७); महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा-२८); महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ (१९७६ चा महा-३८); महाराष्ट्र वनविकास (शासनाकडून अथवा वनविकास महामंडळाकडून होणा-या वनोत्पादनाच्या विक्रीवरील कर) (चालू राहणे) अधिनियम, १९८३ (१९८३ चा महा २२); महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रांतील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९७ (१९९७ चा महा. ४५), अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम, २००६, (२००७ चा २)जैविक विविधता अधिनियम, २००२ (२००३ चा १८) यांमध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील.

प्रकरण दोन

**ग्रामसभेची रचना व कार्ये**

**३. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेची रचना :—**ग्रामस्तरावरील पंचायतीच्या मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट असलेल्या सर्व व्यक्ती ह्या, त्या गावाच्या ग्रामसभेचे सदस्य असतील.

**४. अनुसूचित क्षेत्रातील गाव घोषित करणे :—**(१) आपल्या वस्तीची किंवा वस्तींच्या गटाची अथवा पाड्याची किंवा पाड्यांच्या गटाची गाव म्हणून नोंद केली जावी असे कोणत्याही वस्तीच्या किंवा वस्तींच्या गटाच्या अथवा पाड्याच्या किंवा पाड्यांच्या गटाच्या व्यक्तींचे मत झाले असेल तर, त्या व्यक्तींना, त्या वस्तीच्या किंवा पाड्याच्या अथवा वस्तींच्या किंवा यथास्थिति, पाड्यांच्या गटाच्या मतदार यादीत नाव नोंदवलेल्या एकूण मतदारांपैकी किमान निम्म्या मतदारांच्या बहुमताने तशा आशयाचा ठराव संमत करता येईल आणि त्याबाबतची माहिती जिल्हाधिका-याला कळवून तो ठराव संबंधित उप विभागीय अधिका-याकडे पाठवता येईल.

(२) उप-विभागीय अधिकारी, ३ महिन्यांच्या आत त्या ठरावाच्या गुणदोषांची चौकशी करील. या प्रयोजनासाठी तो, या बाबीस व्यापक प्रसिद्धी दिल्यानंतर व सर्व संबंधित घटकांशी विचारविनिमय करून, त्या वस्तीच्या किंवा पाड्याच्या अथवा वस्तींच्या किंवा पाड्यांच्या गटाच्या सर्व नोंदणीकृत मतदारांची एक बैठक बोलावील. त्यानंतर तो प्रस्तावित गाव त्या अधिनियमाच्या तरतुदींची पूर्तता करते किंवा कसे याबाबत स्पष्टपणे नमूद करून, आपल्या निष्कर्षासह एक अहवाल जिल्हाधिका-याला सादर करील :

परंतु, उप विभागीय अधिका-याने असा ठराव मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत त्याबाबतच्या प्रश्नावर निर्णय केला नसेल तेव्हा जिल्हाधिकारी स्वतःहून अशा ठरावाची दखल घेईल आणि त्या संबंधात ४५ दिवसांत समुचित आदेश काढील.

(३) असा निर्णय फेटाळून लावणा-या उप विभागीय अधिका-याच्या निर्णयाविरुद्धचे अपील जिल्हाधिका-यांकडे करण्यात येईल व जिल्हाधिका-यांचा त्यावरील निर्णय अंतिम राहील.

(४) नवीन गाव हे आधिसूचित करावयाचे आहे याबाबत जिल्हाधिका-यांची खात्री पटली असेल तर तो त्या अधिनियमाच्या प्रकरण तीन-अ प्रमाणे अधिसूचना काढण्यासाठी विभागीय आयुक्ताकडे आपली शिफारस पाठवील ;

परंतु, जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिका-याचा निर्देश मिळाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत त्यावर निर्णय देईल, तसे न केल्यास, त्याबाबतीत गाव जाहीर केल्याची मान्यता देण्यात आली असल्याचे समजण्यात येईल.

५. **पंचायत ही ग्रामसभेची कार्यकारी समिती असणे :—**(१) पंचायतीला ग्रामसभेची कार्यकारी समिती असल्याचे मानण्यात येईल.

(२) पंचायत ही ग्रामसभेचे सर्वसाधारण अधीक्षण, नियंत्रण व निदेश यानुसार कार्य करील.

६. **अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेचा सचिव कार्यालय इत्यादी :—**(१) एखाद्या पंचायतीत एकापेक्षा अधिक ग्रामसभा असतील तर अशा परिस्थितीत, ग्रामपंचायतीचा सचिव हा त्या सर्व ग्रामसभांचा सचिव असेल, त्याच्या अनुपस्थितीत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील प्रकरण ३ मधील ५४ क प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(२) पंचायतीचे कार्यालय हेच ग्रामसभेचे कार्यालय असेल. एका पंचायतीमध्ये एकापेक्षा अधिक ग्रामसभा असतील तर, प्रत्येक ग्राम सभेचे तिच्या गावामध्ये सार्वजनिक इमारत, समाजमंदीर, शाळा किंवा जेथे जनतेला सहज प्रवेश मिळेल अशी कोणतीही जागा आणि अशी कोणतीही जागा उपलब्ध नसेल तर त्याबाबतीत एखाद्या सामान्य व्यक्तीचे घर, यासारखे तिचे स्वतःचे कार्यालय असेल.

परंतु, या कार्यालयासाठी कोणत्याही प्रकारचे भाडे दिले जाणार नाही :

७. **ग्रामसभेच्या बैठकी खुल्या स्वरुपात घेणे :—**(१) ग्रामसभेची प्रत्येक बैठक किंवा कार्यवाही जाहीरपणे आयोजित करण्यात येईल.

(२) ग्रामसभेची बैठक बंदिस्त इमारतीमध्ये घेण्यात येणार असली तरी, दरवाजे बंद ठेवण्याची किंवा प्रवेश बंद करण्याची कोणतीही तरतूद केली जाणार नाही.

**८. निर्णय घेण्याबाबतची कार्यपद्धती :—**(१) शक्य तेथवर ग्रामसभेचे कामकाज सर्वसंमतीने चालविण्यात येईल.

(२) बैठकीमध्ये कोणत्याही मुद्यावर एकमत न झाल्यास त्या मुद्यावर ग्रामसभेने तरतुदीनुसार ठरविल्याप्रमाणे घेण्यात येणा-या पुढील बैठकीमध्ये चर्चा करण्यात येईल.

(३) दुस-या बैठकीतदेखील एकमत न झाल्यास त्या बैठकीत बहुमताच्या आधारे निर्णय घेतला जाईल.

९. **ग्रामसभेच्या बैठकीची कार्यवाही :—**(१) निवडणुकीनंतर आणि प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये पहिली ग्रामसभा सरपंचाच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येईल. सरपंचाच्या अनुपस्थितीत उप सरपंच आणि त्या दोघांच्या (सरपंच व उप सरपंच) अनुपस्थितीत अनुसूचित जमातीचा सदस्य हा ग्रामसभेचा अध्यक्ष म्हणून निवडला जाईल. पंचायतीचा सरपंच किंवा उप सरपंच किंवा सदस्य हा वरील परिस्थितीव्यतिरिक्त एरव्ही ग्रामसभेचा अध्यक्ष म्हणून काम करण्यास पात्र असणार नाही :

परंतु ज्या गावामध्ये अनुसूचित जमातींची लोकसंख्या १० टक्यांपेक्षा कमी असेल तेथे, अनुसूचित जमातीतील नसलेल्या व्यक्तींमधून अध्यक्ष निवडता येईल.

(२) या नियमाच्या पोट-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या बैठकी व्यतिरीक्त ग्रामसभेच्या बैठकीसाठी अध्यक्षाची निवड शक्य तेथवर सर्वसंमतीने करण्यात येईल. सर्वसंमती न झाल्यास, त्यावर बहूमत घेण्यात येईल केवळ अनुसूचित जमातींतील व्यक्ती हीच अध्यक्ष असेल.

(३) ग्रामसभेच्या बैठकीची गणपूर्ती एकूण सदस्यांच्या २५ टक्के किंवा १०० यापैकी जी कमी असेल त्या संख्येएवढी असेल.

(४) गणपूर्तीच्या अभावी बैठक तहकूब करण्यात येईल. तहकूब केलेल्या बैठकीनंतर बोलावण्यात आलेल्या बैठकीत देखील गणपूर्ती आवश्यक असेल.

(५) सचिव, ग्रामसभेच्या बैठकीमध्ये मागील महिन्यातील प्राप्ती व खर्च, कामगारांचा हजेरीपट खरेदी व विक्री यांच्या संपूर्ण अभिलेखाचे सविस्तर विवरणपत्र सादर करील.

(६) बैठकीची समाप्ती करताना सचिव हा ग्रामसभेने नामनिर्देशित केलेली व्यक्ती ग्रामसभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांचे संक्षिप्त विवरणपत्र तयार करील. ते विवरण पत्र त्या बैठकीमध्ये वाचून दाखविण्यात येईल. विवरणपत्राच्या खरेपणाबाबत एकमत झाल्यानंतर अध्यक्ष आणि सचिव आणि लेखनिक त्यावर स्वाक्षरी करतील.

**१०. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेच्या स्थायी समित्या :—**(१) ग्रामसभा गावाच्या कारभाराविषयीच्या विविध पैलुंबाबतच्या आपल्या जबाबदा-या पार पाडण्याच्या दृष्टीने शांतता समिती, न्याय समिती, साधनसंपत्ती नियोजन व व्यवस्थापन समिती, मादकद्रव्य नियंत्रण समिती, कर्ज नियंत्रण समिती, बाजार समिती, ग्रामसभाकोष समिती आणि ग्रामसभेस उचित वाटतील अशा इतर समित्या स्थापन करील. याशिवाय गरजेअनुसार तात्पुरती व तदर्थ अशा समित्यादेखील स्थापन करता येतील. ह्या समित्या ग्रामपंचायत व ग्रामसभा अशा दोन्हींना देखील उत्तरदायी असतील.

(२) स्थायी समितीचे सदस्य ग्रामसभा बैठकीमध्ये उपस्थित सदस्यांमधून निवडण्यात येतील. ग्रामसभेच्या कामाचे स्वरुप व आवश्यकता यावर अशा सदस्यांची निवड अवलंबून राहील. ग्रामसभा एकुण सदस्य आणि महिलांचे व समाजातील इतर घटकांचे प्रतिनिधित्त्व याबाबतची संख्या ठरवील. स्थायी समितीचा कार्यकाळ दोन वर्षे इतका असेल :

परंतु, कोणत्याही समितीच्या एकूण सदस्यांच्या निम्मेपेक्षा महिलांची संख्या कमी असणार नाही.

(३) स्थायी समितीच्या अध्यक्षाचे, नामनिर्देशन हे ग्रामसभेकडून संबंधित स्थायी समितीच्या सदस्यांमधून करण्यात येईल.

(४) स्थायी समितीच्या सचिवाची निवड ही, ग्रामसभेकडून करण्यात येईल. ग्रामसभेस संबंधित प्रशासकीय विभागाच्या सल्ल्याने स्थायी समितीचे काम करण्यासाठी त्या ग्रावाच्या अधिकारितेतील कोणत्याही कर्मचा-यास देखील नामनिर्देशित करता येईल. अशा कर्मचा-यास मत देण्याचा अधिकार नसेल आणि तो स्थायी समितीला तिचे कामकाज पार पाडण्यास सहाय्य करील.

(५) ग्रामसभेने विविध विषयांवर घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही, संबंधित स्थायी समितीवर असेल.

**११. ग्रामसभेच्या स्थायी समितीची कार्यपद्धती :—**ग्रामसभेच्या स्थायी समितीची कार्यपद्धती ग्रामसभेप्रमाणेच असेल ती पुढीलप्रमाणे असेल :—

(१) ग्रामपंचायतीसह सर्व स्थायी समित्यांच्या बैठकी खुल्या स्वरुपात होतील.

(२) स्थायी समितीच्या प्रत्येक बैठकीचा दिनांक, वेळ व ठिकाण आणि तीमध्ये करण्यात येणारे कामकाज अशा प्रत्येक बैठकीची नोटीस स्थायी समितीच्या सचिवाकडून किमान तीन दिवस अगोदर देण्यात येईल.

(३) स्थायी समितीच्या बैठकीची गणपूर्ती, अध्यक्षासह निम्म्यासंख्येएवढी असेल.

(४) ग्रामसभेच्या सदस्यास स्थायी समितीच्या कोणत्याही बैठकीस उपस्थित राहता येईल. अध्यक्षाच्या परवानगीने त्याला चर्चेच्या विषयावर कोणताही प्रश्न विचारता येईल :

परंतु त्याला किंवा अशा सदस्याला मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

(५) स्थायी समितीचे सर्व निर्णय, ग्रामसभेला लागू असलेल्या कार्यपद्धतीअनुसार घेण्यात येतील.

(६) स्थायी समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या महत्त्वाच्या निर्णयांचा गोषवारा, कामकाज नोंदवहीमध्ये नोंदवून घेण्यात येईल आणि अशा बैठकीच्या कार्यवृत्तांवर अध्यक्ष व सचिव स्वाक्षरी करतील.

(७) स्थायी समित्यांचे सर्व निर्णय आणि इतर अभिलेख हा, त्या गावाच्या ग्रामसभेच्या लगेच पुढच्या बैठकीपुढे ठेवण्यात येईल.

**१२. ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयाविरुद्ध आक्षेप :—**(१) पंचायत व ग्रामसभा यांचा सर्व अभिलेख सर्व ग्रामस्थांसाठी खुला असेल. पंचायत समितीने, जिल्हा परिषदेने आणि शासनाने पदनिर्देशित केलेल्या प्राधिका-यास तो अभिलेख तपासणी, छाननीकरिता उपलब्ध करून देण्यात येईल.

(२) आक्षेपाला ग्रामसभेने घेतलेल्या कोणत्याही निर्णयाविषयी घेतलेल्या कोणताही आक्षेप हा पुनर्विचारार्थ ग्रामसभेच्या सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित करता येईल.

(३) आक्षेप दूर करण्यासाठी ग्रामसभेला सहाय्य करण्याकरिता अभीक्षक असणे आवश्यक आहे असे आक्षेपकांचे अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीचे मत असेल तर, त्याला अभीक्षकाने ग्रामसभेच्या बैठकीस उपस्थित राहण्याबाबत अभीक्षकाची नियुक्ती करण्याकरिता गट विकास अधिका-याला विनंती करता येईल.

(४) अभीक्षकाची आवश्यकता असल्याबाबत गट विकास अधिका-याची खात्री पटल्यास त्याला आक्षेपकाच्या सूचनेनुसार ग्रामसभेच्या बैठकीकरिता अभीक्षकास विस्तार अधिका-याच्या दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी नियुक्त करता येईल.

(५) अशा प्रकारे नियुक्त केलेला अभीक्षक, आक्षेपकाच्या गा-हाण्यांचे निवारण करण्यात सहाय्य करील.

(६) तक्रारीचे निवारण न झाल्यास, आक्षेपकास अथवा अभीक्षकास ती बाब जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-याकडे निर्दिष्ट करता येईल व तो त्या आक्षेपकास संबंधित बाबीची चौकशी करून आवश्यक त्या सूचना देईल.

**१३. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांच्या संयुक्त बैठकी :—**(१) प्रत्येक ग्रामसभा तिच्या अधिकारितेमध्ये तिची कार्ये पार पाडण्यास सक्षम असेल :

परंतु इतर ग्रामसभांबरोबर काम करणे आवश्यक आहे, अशा प्रकरणांमध्ये पंचायतीच्या अधिकारितेअंतर्गत येणा-या सर्व ग्रामसभांची एक संयुक्त बैठक बोलाविता येईल.

(२) ग्रामसभांची संयुक्त बैठक ही जणू काही त्या संबंधित ग्रामसभा ही एकच संस्था असल्याप्रमाणे, ग्रामसभेला लागू असलेल्या तरतुदीनुसार घेण्यात येईल.

(३) संयुक्त बैठकीमध्ये शक्य असेल तेथवर सर्वसंमतीने निवडून आलेली व्यक्ती त्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल.

(४) संयुक्त बैठकीमध्ये प्रत्येक ग्रामसभेचे किमान २५ टक्के सदस्य किंवा प्रत्येक ग्रामसभेचे शंभर सदस्य यापैकी जी कमी असेल तेवढी उपस्थिती बंधनकारक असेल. बैठकीत गणपूर्ती न झाल्यास, त्याच दिवशी पुढील बैठकीचा दिनांक निश्चित केला जाईल आणि तो सर्व ग्रामसभांना पाठविण्यात येईल.

(५) निर्णय प्रक्रिया ही, एकल ग्राम सभेमधील निर्णय प्रक्रियेप्रमाणेच असेल.

प्रकरण तीन

**ग्रामसभा लेखे**

**१४. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा कोष :—**(१) ग्रामसभा एक ग्रामसभा कोष ठेवील.

(२) या कोषामध्ये रोख रक्कम व माल यांसारख्या ऐच्छिक अंशदानासह कोणत्याही रुपामध्ये प्राप्त झालेले अंशदान आणि गौण वन उपज, गौण खनिजे इत्यादी पासून मिळालेली रक्कम आणि ग्रामसभेने साधनसंपत्तीच्या वापरावर लादलेले आकार किंवा आकारलेला द्रव्यदंड यांचा समावेश असेल. यामध्ये शासनाला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही प्रकांती योजनेखाली हस्तांतरित केलेल्या बाबींचाही समावेश असेल.

(३) हा ग्रामसभा कोष, ग्रामसभेच्या नियंत्रणाखाली असेल. ग्रामसभेला तिच्या ठरावांनुसार कोषाचा वापर करण्याचे संपूर्ण अधिकार असतील.

(४) ग्रामसभा कोष हा पंचायतीचा सचिव व ग्रामसभेने सर्वानुमते नामनिर्देशित केलेले इतर दोन सदस्य यांचा समावेश असलेल्या ग्रामसभा कोष समितीद्वारे चालवण्यात येईल. दोन सदस्यांपैकी एक सदस्य ही महिला असेल. सर्व लेखे माहितीसाठी व अंतिम मंजुरीसाठी ग्रामसभेसमोर मांडण्यात येतील.

**१५. ठेवावयाचे लेखे :—**(१) ग्रामसभा कोषाचे लेखे हे ग्रामसभा कोष समितीच्या सदस्याकडून एका नोंदवहीत ठेवण्यात येतील.

(२) ग्रामसभा कोषाच्या जमा व खर्चाचे विवरणपत्र ग्रामसभेच्या पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.

**१६. ग्रामसभा निहाय लेखे :—**प्रत्येक ग्रामसभा जमा व खर्चाचा एक स्वतंत्र लेखा ठेवील. तो लेखा संबंधित ग्रामसभेकडून प्रमाणित करण्यात येईल. ग्रामसभा कोषाचे व पंचायतीचे लेखे, पंचायत समिती, जिल्हा परिषद व स्थानिक निधी प्राधिकारी यांच्या लेखापरिक्षणाच्या अधीन असतील :

परंतु ग्रामविकास व जलसंधारण विभाग, पारदर्शकता व उत्तरदायित्व यांची सुनिश्चिती करण्यासाठी नियम प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत, ग्रामसभा कोषाच्या अभिलेखांचे इलेक्ट्रॉनिक परिरक्षण करण्यासह लेखांकनाअनुदेश प्रशिक्षण देणे व त्याबाबतीत तरतूद करणे यांसाठी प्रयत्न करील.

प्रकरण चार

**शांतता व सुरक्षा आणि तंटामुक्ती**

**१७. अनुसूचित क्षेत्रामध्ये शांतता, सुरक्षा राखण्यामध्ये व तंटामुक्तीसाठी ग्रामसभेची भूमिका :—**समाजातील परंपरा आणि संबंधित कायदे व त्याखालील संबंधित नियम लक्षात घेता, ग्रामसभेने तिच्या क्षेत्रात शांतता, सुरक्षा व सुव्यवस्था राखणे हे ग्रामसभेचे मूलभूत कर्तव्य असेल.

(१) ग्रामसभा तिच्या क्षेत्रात पुढील कार्ये /कामे करण्यासाठी सक्षम असेल :—

(एक) शांततापूर्ण वातावरण ठेवणे ;

(दोन) प्रत्येक नागरिकाच्या स्वाभिमानाची व अभिव्यक्ती स्वातंत्र्याची जोपासना करण्याबाबत उपाययोजना करणे ;

(तीन) महिलांशी असभ्य वर्तणूक, सार्वजनिक ठिकाणी मारामा-या किंवा भांडणे इत्यादीसह समाजविघातक घटकांसारख्या दुष्ट प्रवृत्तींना पायबंद घालणे, तंटे मिटविणे.

१८. **शांतता समिती :—**(१) ग्रामसभेला शांतता समिती घटीत करता येईल, शांतता समितीमध्ये किमान ३३ टक्के महिला आणि ५० टक्के अनुसूचित जमातीतील सदस्य असतील.

(२) शांतता समिती शेजारच्या गावांबरोबर निकोष संबंध ठेवील. शांतता समिती शेजारच्या गावांचे सामाईक हित व परस्परावलंबित या बाबींमध्ये शेजारच्या गावांशी विचारविनिमय करून त्याआधारे कोणती कार्यवाही करण्यात येईल याची खातरजमा करील.

(३) ग्रामसभेला, पुढील बाबतीत शांतता समितीस अधिकार प्रदान करता येतीलः

(एक) गावच्या शांततेला बाधक ठरणा-या घटनांची चौकशी करणे आणि निर्णय घेण्यासाठी ग्रामसभेला माहिती देणे.

(दोन) शांतता भंग करणा-या घटकांना समुपदेशन करणे व लवाद म्हणून कामे करणे.

(तीन) आवश्यकता असेल तेथे तात्काळ कार्यवाही करणे व त्यानंतर ग्रामसभेला माहिती कळविणे.

(चार) ग्रामसभेच्या मान्यतेने योग्य कार्यवाही करण्यासाठी उप विभागीय दंडाधिकारी किंवा पोलीस अधिकारी यांना माहिती देणे किंवा विनंती करणे.

१९. **पोलिसांची भूमिका :—**पोलिसांना कोणत्याही गुन्ह्यांसंबंधात माहिती मिळाली असेल तर, पोलीस ठाण्यामध्ये अहवालाची नोंद केल्यानंतर त्याची एक प्रत सर्व प्रकरणांमध्ये ग्रामसभा किंवा शांतता समिती यांना पाठविण्यात येईल.

## प्रकरण - पाच

## नैसर्गिक साधनसंपत्ती शेती व जमीन यांचे व्यवस्थापन

२०. **नैसर्गिक साधनसंपत्तीबाबत ग्रामसभेने संरक्षक उपाययोजना करणे :—**(१) स्थानिक परंपरेनुसार आणि केंद्र व राज्य सरकारांच्या कायद्याच्या आशयानुसार पाणी, वन, जमीन व खनिज यांसह ग्रामसभेच्या क्षेत्रात स्थित नैसर्गिक साधनसंपत्ती तसेच जिच्यावर त्या ग्रामसभेचा परंपरागत अधिकार आहे अशी साधनसंपत्ती यांबाबत संरक्षक उपाययोजना करणे आणि त्यांचे जतन करणे याकरिता ग्रामसभा सक्षम आहे. हे कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी, ग्रामसभेला त्यांच्या व्यवस्थापनामध्ये क्रियाशील भूमिका बजावता येईल.

(२) ग्रामसभा, पुढील गोष्टी घडून येतील अशा प्रकारे साधनसंपत्तीचा विनियोग होत असल्याबाबत खात्री करील **:—**

(एक) उपजिविकेची साधने शाश्वत आहेत ;

(दोन) लोकांमधील विषमता वाढत नाही ;

(तीन) साधन संपत्ती काही लोकांपुरतीच मर्यादित ठेवलेली नाही ;

(चार) शाश्वततेचा विचार करून स्थानिक साधनसंपत्तीचा पूर्ण विनियोग होत आहे.

(३) प्रचलित नियमांनुसार नैसर्गिक व इतर साधनसंपत्तीवरील व्यक्तिगत अधिकार यथोचितरीत्या प्रदान केले असले तरी त्यांचे व्यवस्थापन हे सामूहिक वारशांचा अंगभूत आशय विचारात घेऊन करण्यात येईल.

२१. **साधनसंपत्ती नियोजन व व्यवस्थापन समिती :—**(१) ग्रामसभेची एक स्थायी साधनसंपत्ती नियोजन व व्यवस्थापन समिती असेल.संबंधित विभागांचे सर्व प्रतिनिधी या साधनसंपत्ती नियोजन व व्यवस्थापन समितीचे सल्लागार म्हणून कार्य करतील आणि त्यांच्या सभांना उपस्थित राहतील.

(२) साधनसंपत्ती नियोजन व व्यवस्थापन समिती गावाच्या प्रदेशातील आणि सभोवतालच्या प्रदेशातील सर्व साधनसंपत्तीच्या कायम स्वरूपी उपयोग व ग्रामसभेच्या अधिकार क्षेत्रात एक योजना आखील आणि त्यानुसार तिचा वापर करण्यासाठी ग्रामसभेस सल्ला देईल व सहकार्य करील.

(३) साधनसंपत्ती नियोजन व व्यवस्थापन समिती ही, साधनसंपत्तीचे व्यवस्थापन व वापर याविषयीचे मतभेद अथवा विवाद यांसह तिच्या सर्व पैलूंचा विचार करील. ग्रामसभेला असे विवाद मिटवण्याकरिता साधनसंपत्ती नियोजन व व्यवस्थापन समितीस प्राधिकार देता येईल. जर साधनसंपत्ती नियोजन व व्यवस्थपन समिती विवाद मिटवण्यास समर्थ नसेल तर, त्या विवादांवर ग्रामसभेंच्या बैठकींमध्ये विचार करण्यात येईल. ग्रामसभेचा निर्णय अंतिम असेल.

(४) साधनसंपत्ती नियोजन व व्यवस्थपन समितीला शेती, गौण खनिज यांसारख्या विनिर्दिष्ट बाबींसंबंधात तिच्या कार्यांमध्ये सहाय्य करण्यासाठी उप-समित्या स्थापन करता येतील.

**(२२) अनुसूचित क्षेत्रात ग्रामसभेने शेतीकरिता नियोजन करणे :—**(१) शेतीद्वारे शेतकरी आर्थिकदृष्ट्या वर्धनक्षम होतील अशाप्रकारे ग्रामसभा तिच्या गावामध्ये शेतीकरिता नियोजन करण्यास व त्याबाबत उपाययोजना करण्यास सक्षम आहे.

(२) ग्रामसभेच्या निर्णयांमध्ये इतर गोष्टींबरोबरच पुढील महत्त्वाचे मुद्दे अंतर्भुत असतील.

(क) जमिनीची धूप थांबविणे.

(ख) पिकांचे रक्षण करण्यासाठी चराईक्षेत्रामध्ये नियमितता आणणे आणि कुरणांची क्षमता वाढविणे.

(ग) पावसाचे पाणी साठवणे त्याचा शेतीसाठी वापर करणे व त्याच्या वितरणाची व्यवस्था करणे.

(घ) परस्पर सहकार्याने अथवा अन्य प्रकारे बिया, खते, इत्यादी तसेच ज्ञानाची देवाणघेवाण करणे याबाबत तरतूद केल्याची सुनिश्चिती करणे.

(ङ) सेंद्रीय खते, रासायनिक खते व कीटकनाशके यांचे प्रचालन करणे.

२३. **अनुसूचित क्षेत्रातील भू-व्यवस्थापन :—**(१) ग्रामसभा गावाच्या भू-अभिलेखामध्ये शेतक-यांची नावे अचूकपणे नोंदवलेली आहेत आणि अभिलेख योग्यरित्या ठेवण्यात आलेला आहे याची सुनिश्चित करण्याकरिता ग्रामसभेच्या बैठकीमध्ये संपूर्ण जमिनीच्या अभिलेखाचा आढावा घेईल.

(२) संस्थात्मक किंवा बिगर संस्थात्मक धनकोंचा जमिनीच्या गहाणासंबंधातील सर्व प्रकरणे माहितीसाठी ग्रामसभेसमोर ठेवण्यात येतील.

२४. **अनुसूचित क्षेत्रातील जमिनीच्या अन्यसंक्रामणास प्रतिबंध :—**(१) अनुसूचित जमातीतील व्यक्तींची कोणतीही जमीन अनुसूचित जमातेतर व्यक्तींकडे बेकायदेशीरपणे हस्तांतरित होणार नाही याची ग्रामसभा सुनिश्चिती करील.

(२) ग्रामसभा तिच्याकडे आलेल्या तक्रारींच्या आधारे किंवा स्वतः होऊन कोणत्याही जमीन व्यवहारांची चौकशी करण्यास किंवा तसे करण्यासाठी शांतता समितीला प्राधिकृत करण्यास सक्षम असेल.

(३) शांतता समिती तिचे निष्कर्ष ग्रामसभेपुढे ठेवील.

(४) अनुसूचित जमातीतील व्यक्तींच्या जमिनींचे बेकायदेशीरपणे अनुसूचित जमातेतर व्यक्तींकडे अन्यसंक्रामण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत, असे ग्राम सभेचे मत असल्यास तिला अशा व्यवहारास मनाई करण्याच्या सूचना देता येतील.

(५) ग्रामसभेस गावाच्या भू-अभिलेखाबाबत पुढील कामे करता येतील :—

(क) जमिनीच्या व्याप्तीचा तपशील आणि उपभोक्त्यांसह खातेदारांची नावे समाविष्ट असलेली धारणजमिनींची यादी तयार करणे.

(ख) खातेदार हा खरोखरीच अनुसूचित जमातीचा आहे किंवा कसे हे पाहण्याकरिता सर्व खातेदारांच्या सामाजिक दर्जाच्या दाव्यांच्या खरेपणाची पडताळणी करणे.

(ग) जमीन एखाद्या आदिवासीच्या नावावर खरेदी केलेली आहे आणि बिगर आदिवासी व्यक्तीकडून तिचा उपभोग घेतला जात आहे किंवा कसे याबद्दल पडताळणी करणे.

(घ) इच्छा असल्यास शेतात प्रत्यक्ष जाऊन ती जमीन आदिवासीकडून अथवा ज्यांनी पट्टा गहाण इत्यादींवर घेतलेली असेल अशा आदिवासीतेतर व्यक्तींकडून करण्यात येत आहे किंवा कसे याबाबत प्रत्यक्ष पाहणी करणे.

(ङ) शासकीय जमिनीच्या अभिहस्तांकना करीता लाभाधिकारींची यादी तयार करणे.

(च) वरील (क) ते (ङ) मध्ये नमूद केलेल्या सर्व प्रकरणांमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) किंवा त्याखाली केलेले नियम यांच्या तरतुदीतील संहितेचा भंग करून विवक्षित व्यवहार करण्यात आला असलेबाबत संपूर्ण तपासणीअंती ग्रामसभेची खात्री पटल्यास, ग्रामसभा ज्यांच्याबाबतीत भंग करण्यात आला असेल त्या बाबींचा तपशील नमूद केलेला ठराव संमत करील. हा ठराव प्राप्त झाल्यानंतर, सक्षम प्राधिकारी परिणामकारक कारवाई करील.

(६) जमिनीच्या ताब्यासंबंधात परस्परविरोधी दावे असतील तर, ग्रामसभा एक बैठक बोलावील आणि योग्य तो ठराव संमत करण्यासाठी संबंधितांकडून अशा दाव्यांच्या पुष्ठ्यर्थ पुरावा मागवील. ग्रामसभा, बिगर आदिवासी व्यक्तींच्या नावे अन्यसंक्रामण झाल्याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यावर एक बैठक बोलावील किंवा स्वतः होऊन योग्य तो निर्णय देईल आणि अनुसूचित जमातीच्या जमिनीच्या मालकाकडे जमिनीचा ताबा पूर्ववत करण्यासाठी आवश्यक ती कारवाई करण्याकरिता सक्षम अधिका-याकडे देण्याकरिता पाठवील.

(७) ग्रामसभेच्या निर्णयाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस ठरावाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत सक्षम प्राधिका-याकडे विनंतीअर्ज दाखल करता येईल.

(८) सक्षम प्राधिका-यास एकतर तो विनंतीअर्ज दाखल करून घेता येईल किंवा फेटाळून लावता येईल किंवा ग्रामसभेकडे पुर्नविचारार्थ निर्दिष्ट करता येईल.

(९) असा निर्देश प्राप्त झाल्यावर, ग्रामसभा तीस दिवसांच्या कालावधींच्या आत बैठक बोलावील, विनंती अर्जावर सुनावणी करील, त्या निर्देशावर ठराव संमत करील आणि तो सक्षम प्राधिका-याकडे पाठवील.

(१०) संबंधित सक्षम प्राधिकारी ग्रामसभेच्या ठरावावर विचार करील आणि एकतर विनंतीअर्ज स्वीकारणारा किंवा फेटाळणारा समुचित आदेश देईल.

(११) सक्षम प्राधिकारी, आदिवासी व बिगर आदिवासीं यांच्या समावेश असलेल्या जमिनीच्या अन्यसंक्रामणाच्या प्रत्येक प्रकरणात, ग्रामसभेने विचारात घेतलेल्या मताबद्दल, संबंधित सचिवांच्या मार्फत संबंधित ग्रामसभेला न चुकता कार्यवाहीत सहभागी करून घेईल आणि ग्रामसभेच्या मताची यथोचितरीत्या तपासणी करण्यात येईल. यामुळे सक्षम प्राधिकारी, स्वतःहून किंवा वैयक्तिक तक्रारींवरुन आदिवासीकडून बिगर आदिवासींकडे जमिनीच्या होणा-या अन्यसंक्रामणास प्रतिबंध करण्याची किंवा ती जमीन आदिवासींना परत करण्याची कार्यवाही सुरू केली असेल तेव्हा देखील वरील बाबतीत दखल घेण्यात येईल.

(१२) सक्षम प्राधिकारी, प्रत्येक प्रकरणातील न्यायनिर्णयाच्या प्रती ग्रामसभेला देईल.

**२५. अन्यसंक्रामण केलेली जमीन परत करणे :—**(१) जर ग्रामसभेला आढळून आले की, अनुसूचित जमातीतील सदस्याव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीकडे, अनुसूचित जमातीची मालकी असलेल्या कोणत्याही जमिनीचा, कोणत्याही कायदेशीर प्राधिकाराशिवाय ताबा असेल तर, ग्रामसभा मुळात ती जमीन ज्या व्यक्तीच्या मालकीची होती त्या व्यक्तीकडे आणि ती व्यक्ती मृत असेल तर तिच्या कायदेशीर वारसाकडे अशा जमिनीचा ताबा परत करण्याचा ठराव मंजूर करील. ग्रामसभेचा निर्णय सक्षम प्राधिका-याला कळविण्यात येईल तो ठरावाची पडताळणी करण्यासाठी संक्षिप्त चौकशी करील व जमीन परत करील.

(२) सक्षम प्राधिका-याच्या मते, ठराव कायदेशीर नसेल तर, तो त्याच्या मतांसह तो ठराव पुनर्विचारासाठी ग्रामसभेकडे लेखी पाठवील.

(३) ग्रामसभेने नमूद केलेल्या कारणांसह आपला निर्णय कायम ठेवला असेल व लेखी पुरावा दाखल केला असेल तर सक्षम अधिकारी सखोल चौकशी करील व त्यामध्ये कार्यवाहीत सहभागी झालेल्या पक्षकारांपैकी ग्रामसभा हा एक पक्षकार असेल आणि त्यानंतर तो अंतिम निर्णय देईल.

**(२६) भूमी संपादनापूर्वी विचारविनिमय :—**(१) शासन, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींन्वये अनुसूचित क्षेत्रात भूमी संपादनाचा विचार करीत असेल तेव्हा, शासन किंवा संबंधित भूमी प्राधिकारी प्रस्तावासोबत पुढील लेखी माहिती ग्रामसभेकडे सादर करील **:—**

(एक) नैसर्गिक साधनसंपत्ती व त्याच्या लगत राहणारी जनता यांच्यावर प्रकल्पाच्या होणा-या संभाव्य परिणामांसह प्रस्तावित प्रकल्पाचा संपूर्ण आराखडा.

(दोन) प्रस्तावित भूमीसंपादनाचे तपशील.

(तीन) गावामध्ये स्थायिक होण्याची शक्यता असलेले नवीन लोक आणि ते क्षेत्र व समाज यांवरील संभाव्य परिणाम आणि गावातील लोकांचा प्रस्तावित सहभाग त्यांच्या नुकसानभरपाईची रक्कम, नोकरीच्या संधी.

(चार) पूर्नवसन आराखडा.

(२) संपूर्ण माहिती मिळाल्यानंतर, संबंधित ग्रामसभा या संबंधित प्राधिकरणांच्या किंवा शासनाच्या प्रतिनिधींना बोलाविण्यास सक्षम असतील. समन्स पाठविलेल्या अशा सर्व व्यक्तींनी मुद्यानिहाय स्पष्ट व अचूक माहिती सादर करणे अनिवार्य असेल.

(३) सर्व वस्तुस्थितीचा विचार केल्यानंतर, ग्रामसभा प्रस्तावित भूमी संपादनास आणि विस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसन योजनेसंबंधात शिफारस करील.

(४) ग्रामसभेच्या शिफारशीवर जिल्हाधिका-याकडून विचार करण्यात येईल.

(५) जिल्हाधिकारी हा, ग्रामसभेच्या शिफारशींशी सहमत नसेल तर तो ती बाब पुनर्विचारार्थ ग्रामसभेकडे पुन्हा पाठवील.

(६) दुस-यांदा विचारविनिमय केल्यानंतर, जिल्हाधिका-याने ग्रामसभेच्या शिफारशींविरुद्ध आदेश दिला असेल तर तो तसे करण्याची कारणे लेखी नमूद करील आणि ती, माहितीसाठी ग्रामसभेकडे पाठवील.

(७) मोठ्या प्रकल्पांच्या बाबतीत अशा प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या सर्व ग्रामसभांशी विचारविनिमय करण्यात येईल.

**२७. अनुसूचित क्षेत्रामधील प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनवर्सन :—** (१) संबंधित जमीन संपादन करणारी एजन्सी पुनर्वसनासंबंधातील सर्व तपशील ग्रामसभेसमोर ठेवील. सर्व समस्या व प्राधिका-यांनी दिलेली उत्तरे यांची ग्रामसभेच्या कार्यवृत्तांमध्ये नोंद घेण्यात येईल.

(२) ग्रामसभेने बहुमताने निर्णय घेतल्यास पायाभूत सोयीसुविधांसारखी कामे पंचायतीमार्फत करण्यात येतील. ज्यामध्ये तांत्रिक कौशल्याची आवश्यकता असेल अशी कामे संबंधित विभाग व समुचित स्तरावरील पंचायती कडून करण्यात येतील.

२८. **जलस्त्रोतांचे नियोजन व व्यवस्थापन :—**(१) जलस्त्रोतांच्या वापराचे व्यवस्थापन अशा रीतीने करण्यात येईल की, ते भावी पिढ्यांकरिता अक्षत राहील आणि त्या जलस्त्रोतांवर सर्व ग्रामस्थांचे समान अधिकार असतील

(२) पंचायतीतील गौण जलस्त्रोतांचे व्यवस्थापन पंचायतीकडून करण्यात येईल. एका पंचायतीपेक्षा अधिक पंचायतींमध्ये असलेल्या जलस्त्रोतांचे व्यवस्थापन पंचायत समितीकडून करण्यात येईल आणि एका पंचायत समितीपेक्षा अधिक पंचायत समित्यांमध्ये असलेल्या जलस्त्रोतांचे जिल्हा परिषदेकडून व्यवस्थापन करण्यात येईल.

(३) पंचायत किंवा पंचायत समिती किंवा यथास्थिति जिल्हा परिषद यांना संबंधित ग्रामसभेशी किंवा पंचायत समितीशी विचारविनिमय केल्यानंतर, ग्रामसभेच्या परंपरा व प्रचलित कायद्यांचा आशय लक्षात घेऊन संबंधित वेगवेगळ्या प्रयोजनांसाठी गावात उपलब्ध असलेल्या पाण्याच्या वापराचे विनियमन करता येईल, आणि तसेच पाणी वापराच्या प्राथम्यक्रमाविषयी निर्णय देखील घेता येईल.

**(२९) सिंचनाचे व्यवस्थापन :—**(१) पंचायत किंवा पंचायत समिती किंवा यथास्थिति जिल्हा परिषद संबंधित साधनसंपत्ती नियोजन व व्यवस्थापन समितीचा सल्ला घेतल्यानंतर सिंचनासाठी पाण्याचा वापराचे विनियमन करील.

(२) सर्वांना समप्रमाणात पाणी मिळेल अशा रीतीने सिंचनासाठी पाण्याचा वापर करण्यात येईल.

३०. **गौण जलस्त्रोतांचे व्यवस्थापन :—**(१) पंचायत किंवा पंचायत समिती किंवा यथास्थिति जिल्हा परिषद संबंधित साधनसंपत्ती नियोजन व व्यवस्थापन समित्यांशी आणि संबंधित विभागांशी विचारविनिमय करून, सिंचनाकरिता आणि इतर प्रयोजनाकरिता व्यवस्था करील.

(२) सर्व व्यक्तींना गावातील भूप्रदेशांतर्गत स्थित असलेल्या जलस्त्रोतामध्ये करारानुसार मासेमारी करण्याचा समन्यायी अधिकार असेल.

(३) स्थानिक परंपरा ध्यानात घेता, कोणतीही व्यक्ती अथवा व्यक्तींचा गट यांच्या आधिकारितेमध्ये अन्यायरितीने वाढ करत नाही, याची खात्री करण्याच्या दृष्टीने आणि माशांच्या अविरत उपलब्धतेची देखील खात्री करण्याच्या दृष्टीने, मासेमारीच्या कोणत्याही बाबतीत आवश्यक त्या शर्ती लादील.

३१. **इतर सामूहिक मत्तांचे व्यवस्थापन :—**(१) ज्या मत्तांचा वापर परंपरेने समाजाकडून सामूहिकरीत्या केला जात असेल अशा मत्तांचे व्यवस्थापन ग्रामसभेकडून करण्यात येईल.

(२) सामूहिक मत्तांची नोंदवहीमध्ये नोंद करण्यात येईल आणि त्या मत्तांची मालकी, वापर, प्रयोजन यांमध्ये फेरफार करण्यात आलेला नाही आणि त्यावर अतिक्रमण करण्यात आलेले नाही याबाबत दरवर्षी तपासणी करण्यात येईल.

(३) देणगी, श्रमदान सहाय्य यांद्वारे निर्माण झालेल्या कोणत्याही नवीन सामूहिक मत्तांची, नोंदवहीमध्ये तात्काळ नोंद करण्यात येईल.

(४) सामूहिक मत्तांचा वापर, ग्रामसभेमार्फत सामूहिक निर्णयानुसार करण्यात येईल.

## प्रकरण सहा

## खाण व खनिजे

३२. **अनुसूचित क्षेत्रामध्ये गौण खनिजांकरिता योजना तयार करण्याचा ग्रामसभेचा अधिकार :—**(१) ग्रामसभा ही, तिच्या क्षेत्रात आढळून येणारी माती, दगड, वाळू, इत्यादींसह सर्व गौण खनिजांचे उत्खनन व वापर यासाठी योजना तयार करण्याकरिता व त्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता सक्षम असेल.

(२) ग्रामसभांना, पारंपारिक प्रथेनुसार त्यांच्या वैयक्तिक गरजांसाठी गौण खनिजांचा वापर करता येईल :

परंतु अशा खनिजांच्या वापरासाठी ग्रामसभेची परवानगी अनिवार्य असेल.

(३) शासनाचा संबंधित विभाग हा, ग्रामसभेशी विचारविनिमय करून, मगच खाणकाम पट्टा देईल किंवा गौण खनिजांचा लिलाव करील.

(४) ग्रामसभेला, गौण खनिजांचा पट्ट्यांमध्ये पर्यावरणाचे संरक्षण करणे, रोजगार, इत्यादींसाठी शर्ती सूचवता येतील.

(५) गौण खनिजाच्या उत्पादनाचा व्यापार होण्याची शक्यता असलेल्या संबंधित गावांमध्ये, गौण खनिजांचा व्यापारी दृष्टीने वापर करण्यास परवानगी देण्यापूर्वी, ग्रामसभेची पूर्वमंजूरी घेणे ही संबंधित खनिकर्म विभागाची जबाबदारी असेल. खनिकर्म विभागाचा संबंधित अधिकारी या बाबतीत ग्रामसभेला संपूर्ण माहिती पुरविल.

(६) संबंधित खनिकर्म विभाग हा, खाणपट्टा व लिलावासंबंधातील सर्व तपशील ग्रामसभेला देईल. ग्रामसभेला कोणतीही बेकायदेशीर कृती थांबविण्याचा अधिकार असेल. संबंधित खनिकर्म विभाग, ग्रामसभेने केलेल्या तक्रारींवर विचार करील आणि त्याने त्यावर केलेल्या कार्यवाहीबाबत ग्रामसभेला माहिती कळवील.

(७) ग्रामसभा ही, योग्य निर्णय घेऊन, तिची मान्यता किंवा नकार चार आठवड्यांच्या आत कळवील.

(८) ग्रामसभेचा निर्णय बंधनकारक व अंतिम असेल.

परंतु असे की, या नियमांतील तरतूदी फक्त बिगर वनक्षेत्रासाठी लागू राहतील.

३३. **लिलावाद्वारे गौण खनिजांच्या समुपयोजनाकरिता परवानगी देणे :—** गौण खनिजांच्या समुपयोजनाकरिता कोणत्याही शासकीय विभागाने कोणतीही परवानगी दिलेली असेल तर, उक्त शासकीय विभागाने ग्राम सभेची आवश्यक सहमती मिळवणे अनिवार्य आहे.

प्रकरण सात

**मनुष्यबळ**

३४. **अनुसूचित क्षेत्रामध्ये ग्रामसभेने मनुष्यबळाकरिता नियोजन करणे :—** (१) केंद्र व राज्यशासनाच्या विविध योजनांनुसार कार्ययोजना तयार करून व एकतर तिच्यामार्फत अथवा पंचायतीमार्फत त्याची अंमलबजावणी करून गावातील मनुष्यबळाचा पुरेपूर वापर होत असल्याबद्दल खात्री करण्याच्या दृष्टीने कामे हाती घेण्यास ग्रामसभा सक्षम आहे.

(२) ग्रामसभेस, लोकांमध्ये सहकार्याची भावना उत्पन्न होईल, त्यांच्यामध्ये ज्ञान, काम इत्यादींची परस्पर देवाणघेवाण होईल असे कोणतेही काम हाती घेता येईल.

३५. **गावाबाहेरील कामगार घेणे :—** (१) कामांसाठी गावाबाहेरील कामगार घेणा-या सर्व व्यक्तींनी, कामाचे स्वरुप व शर्ती विनिर्दिष्ट असलेल्या लेखी वा मौखिक कराराविषयी ग्रामसभेला संपूर्ण माहिती देणे आणि गावाबाहेरील कोणत्याही कामगारांना कामावर घेण्यापूर्वी तिची परवानगी मिळविणे त्यांना अनिवार्य आहे.

(२) वर नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार ग्रामसभेने परवानगी दिल्यानंतरच लोकांना कामासाठी गावाच्या बाहेर घेऊन जाणे शक्य होईल.

(३) शासकीय व संघटीत क्षेत्रातील आस्थापनांहून अलग अशा खाजगी अथवा असंघटीत क्षेत्रातील व्यवस्थापकांना महिला व बाल कल्याणाविषयी घेण्यात येणा-या कार्यक्रमाची/योजनांची माहिती संबंधित ग्राम सभेला देणे बंधनकारक असेल.

प्रकरण आठ

**मादकद्रव्य नियंत्रण**

३६. **मादकद्रव्य पदार्थांचे विनियमन** :— ग्राम सभा, तिच्या अधिकारितेमध्ये, कोणत्याही प्रकारच्या मादकद्रव्याशी संबंधित सर्व घटकांवर पूर्ण नियंत्रण असण्यास सक्षम असेल. याचा अर्थ ग्राम सभेस,—

(क) आदिवासींना त्यांच्या स्वतःच्या वापराकरिता स्थानिक दारु बनवण्यास दिलेली सूट पूर्णतः थांबवता येईल किंवा गावामध्ये तिचे उत्पादन, विक्री, वितरण, सेवन वा साठा करण्यावर कोणत्याही प्रकारची बंदी आणता येईल.

(ख) एखाद्या दुकानातून किंवा अन्य कोणत्याही मार्गाने कोणत्याही प्रकारच्या मादक पदार्थाची विक्री थांबवण्याच्या सूचना देता येतील. परंतू या सूचना तात्काळ किंवा करार समाप्तीनंतर लगेचच अंमलात येतील.

(ग) कोणत्याही प्रकारचा मादक पदार्थ गावाच्या प्रदेशामध्ये आणण्यास अथवा प्रदेशातून बाहेर घेऊन जाण्यास बंदी घालता येईल.

(घ) कोणत्याही ठिकाणी मादक पदार्थाच्या साठ्यास प्रतिबंध करता येईल किंवा त्यावर मर्यादा घालता येईल.

(ङ) तिच्या गावाच्या प्रदेशामध्ये दारुच्या अथवा अन्य मादक पदार्थांच्या वापरावर संपूर्णपणे बंदी घालता येईल किंवा कोणताही निर्बंध लादता येईल.

(च) गावाच्या प्रदेशामध्ये किंवा बाजारात दारु बनवण्यामध्ये वापरली जाणारी मोहाची फुले (महुआ), काकवी (जॅगरी) इत्यादींच्या विक्रीस मनाई करता येईल.

(छ) ताडीचा, अथवा अन्य कोणत्याही स्थानिक मादक पदार्थाचा वापर यथोचित सुचना देऊन विनियमित करता येईल.

३७. **मादकद्रव्य नियंत्रण समिती :—**(१) ग्रामसभेस मादक पदार्थाशी संबंधित तक्रारींची चौकशी करण्यासाठी, नशा नियंत्रण समिती स्थापन करता येईल आणि लोकांच्या लाभाकरिता, मादक पदार्थावरील नियंत्रणासंबंधात एकतर करण्यात आलेल्या तक्रारींवरुन अथवा स्वतःहोऊन यथोचित सूचना देखिल करता येतील.

(२) मादकद्रव्य नियंत्रण समितीच्या किमान निम्मे सदस्य महिला असतील.

(३) मादकद्रव्य नियंत्रण समितीच्या जबाबदा-यांमध्ये पुढील बाबी समाविष्ट असतील :—

(क) कोणत्याही प्रकारच्या मादकद्रव्याची निर्मिती करणारे कारखाने हे, लायसनमध्ये नमूद केलेल्या सर्व शर्तींचे तंतोतंत पालन करीत असल्याची खात्री करणे आणि कोणतेही उल्लंघन झाल्यास, त्याबाबत सक्षम प्राधिका-यांना कळविणे.

(ख) मद्य निर्मिती, त्याची वितरण व्यवस्था, त्याचे पर्यावरणीय परिणाम, इत्यादींसह जनकल्याणाशी संबंधित सर्व बाबी ग्रामसभेपुढे सादर करण्यास संबंधित कारखान्याच्या मालकाला सांगणे.

(४) ग्राम सभेस, नशा नियंत्रण समितीचे कार्य सुरळीत पार पाडण्याकरिता संबंधित उत्पादनशुल्क विभागाचा सल्ला व त्याची मदत घेता येईल.

**३८. मादक पदार्थ उत्पादकांना ग्रामसभेच्या सूचना :—** ग्रामसभेस जनकल्याणाशी संबंधित बाबींसंदर्भात मादक पदार्थ बनविणा-या कोणत्याही कारखान्याच्या मालकाला योग्य त्या सूचना देता येतील आणि तिला आवश्यक वाटल्यास संबंधित उत्पादनशुल्क विभागास अथवा जिल्हाधिका-यास हस्तक्षेप करण्याची विनंती देखील करता येईल.

**३९. अनुसूचित क्षेत्रांमध्ये नवीन कारखाना किंवा दुकान सुरू करणे :—** (१) ग्रामसभेच्या सहमतीखेरीज, दारु अथवा अन्य मादक पदार्थाची निर्मिती करण्याचा कारखाना स्थापन करण्यात येणार नाही.

(२) ग्रामसभेच्या अधिकारितेमध्ये दारु अथवा मादक पदार्थांची निर्मिती करण्याचा कारखाना स्थापन करण्याबाबतचे किंवा दारुची विक्री करण्याकरिता नवीन दुकान सुरू करण्याबाबतचे शासकीय वा अन्य कोणत्याही अभिकरणाकडून आलेले सर्व प्रस्ताव ग्राम सभेपुढे सादर करणे आवश्यक असेल.

(३) गावातील रहिवासी असलेले आदिवासी किंवा आदिवासी लोकांचा गट हेच केवळ, अनुसूचित क्षेत्रांमध्ये नवीन दुकान किंवा नवीन कारखाना सुरू करण्याकरिता अर्ज करण्यास पात्र असतील.

(४) ग्राम सभेचा निर्णय अंतिम असेल.

(५) ग्राम सभेचा अशा मुद्यावर निर्णय झालेला नसेल किंवा त्या प्रस्तावावर विचार करण्यात आला नसेल तर, तो प्रस्ताव अस्वीकारार्ह असल्याचे मानण्यात येईल.

(६) दारुच्या कारखान्यामुळे गावाच्या हद्दीमध्ये प्रदुषण किंवा कारखाना बंद करण्यासाठी ग्रामसभेला ठराव करता येईल. ग्रामसभेचा ठराव संबंधित कारखान्यावर/शासकीय प्राधिकरणावर बंधनकारक राहील.

(७) गणपूर्तीच्या अभावी, वर नमूद केलेल्या प्रस्तावावर ग्राम सभेच्या बैठकीमध्ये विचार केला जाणार नाही.

**४०. दारुची दुकाने चालू ठेवणे :—** (१) कोणत्याही वर्षाकरिता दारुचे दुकान चालू ठेवण्यासाठी संबंधित उत्पादनशुल्क विभाग ग्राम सभेच्या बैठकीमध्ये एक प्रस्ताव सादर करावा लागेल.

(२) दारुचे दुकान चालू ठेवण्यास परवानगी देण्याकरिता ग्राम सभेमध्ये ठराव मंजूर झाला तरच दारुचे दुकान चालू ठेवता येईल. जर ग्राम सभेने दारुचे दुकान बंद करण्याबाबतचा ठराव मंजूर करण्याचे ठरविले असेल आणि दुकानदाराने स्वेच्छेने ते दुकान बंद केले नसेल तर, नशा नियंत्रण समिती स्वेच्छानिर्णयानुसार ते दुकान बंद करण्यासाठी यथोचित कारवाई करण्यास सक्षम असेल.

(३) ग्रामसभेमध्ये उपस्थित बहुसंख्य महिलांचे ते दुकान बंद करावे असे मत असेल तर, तो ग्राम सभेचा निर्णय असल्याचे समजण्यात येईल.

## प्रकरण नऊ

## गौण वनोत्पादन

**४१. अनुसूचित क्षेत्रामध्ये गौण वनोत्पादन :—** (१) अनुसूचित क्षेत्रातील सर्व गौण वनोत्पादनाचे व्यवस्थापन ग्रामसभेकडे विहित असेल.

(२) ग्रामसभा, साधनसंपत्ती नियोजन व संनियत्रण समिती अथवा शासन नियुक्त करील अशा समिती मार्फत गौण वनोत्पादनावरील मालकी हक्काचे संरक्षण करणे, ते गोळा करण्यासाठी प्रवेश मिळविणे त्याचा वापर व विनियोग पार पाडील.

(३) साधनसंपत्ती नियोजन व संनियंत्रण समिती, संपूर्ण ग्रासभेच्या लाभाकरिता अशा गौण वनोत्पादनाचा निरंतर वापर व समान व्यवस्थापन करण्याचा हेतूने, सर्व गौण वनोत्पादनासाठी एक व्यवस्थापन व वन संवर्धन योजना तयार करील.

(४) साधनसंपत्ती नियोजन व संनियंत्रण समिती मध्ये वन विभागाचा एक सदस्य असेल असा सदस्य हा, शासनाकडून ठरविण्यात येईल त्याप्रमाणे, संबंधित वन विभागाच्या योग्य स्तरामधील असेल :

परंतु, अशा सदस्यास, मतदानाचा हक्क असणार नाही तसेच त्याला साधनसंपत्ती नियोजन व संनियंत्रण समितीच्या सचिवाचे पद धारण करता येणार नाही.

(५) असा सदस्य, कार्यकारी योजना, गौण वनोत्पादनाचा निरंतर वापर, समुचित वनसंवर्धन विघापद्धती इत्यादीसारख्या तांत्रिक बाबींवर साधनसंपत्ती नियोजन व संनियंत्रण समिती आणि ग्रामसभेस सल्ला देईल.

(६) साधनसंपत्ती नियोजन व संनियंत्रण समिती, मार्गस्थ मालाच्या परवान्याचा प्रश्न, उत्पन्नाच्या विक्रीमधून येणा-या उत्पन्नाचा वापर किंवा व्यवस्थापन योजनेतील सुधारणा यासारख्या बाबीं ग्रामसभेपुढे तिच्या मान्यतेसाठी सादर करेल.

(७) वनोत्पादनाची कापणी, निविदा, विक्री इत्यादी बाबी पारदर्शक पद्धतीने पार पाडण्याचे कर्तव्य साधनसंपत्ती नियोजन व संनियंत्रण समिती अधिनियमातील तरतुदीविरुद्ध होणार नाही अशा पद्धतीने गौण वनोत्पादनाच्या व्यवस्थापनात पारदर्शकता व प्रभाविपणा असेल याची सुनिश्चिती होण्यासाठी, शासन ग्रामसभेस किंवा पंचायतीस वेळोवेळी सूचना देऊ शकेल किंवा निदेश देऊ शकेल.

(८) ग्रामसभा, जर तिची इच्छा असेल तर, गौण वनोत्पादनाचा कायमस्वरुपी वापर करण्याची संधी, पणन व वित्तीय व्यवस्थापन व लेखे ठेवणे यांसंबंधीचे तांत्रिक ज्ञान याबाबतचा आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सहाय्याची तरतूद करण्याकरिता संबंधित वन विभागाची मदत मागू शकेल. वन विभागाचा हा सल्ला, ग्रामसभेसमोर तिच्या विचारार्थ सादर करण्यात येईल.

(९) ग्रामसभेस, गौण वनोत्पादन मर्यादित प्रमाणात असण्याच्या प्रकरणीसाधनसंपत्ती कमी असणा-या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटाच्या काही मोजक्याच लोकांना ते वनोत्पादन गोळा करणे व त्याचा वापर करणे याकरिता आळीपाळीने व्यवस्था करता येईल.

(१०) ग्रामसभा, गौण वनोत्पादनाचे समुपयोजन करण्यासंबंधातील दंड आकारणे यांसह, नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी आणि गौण वनोत्पादन गोळा करणारे लोक, ते गोळा करताना वनाचे नुकसान होईल अशी कोणतेही कृती करत नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी, सक्षम असेल.

(११) राज्य शासन आणि समुचित स्तरावरील पंचायत, गौण वनोत्पादनाचे व्यवस्थापन सुरळीतपणे होईल यासाठी ग्रामसभेस प्रशिक्षण व कामे हाती घेणे, मूल्यात भर घालणे व बाजाराशी दुबा साधणे इत्यादी प्रयोजनांकरीता सहाय्य, मार्गदर्शन व मनुष्यबळ पुरविण्यासाठी योजना तयार करील.

४२. **गौण वनोत्पादनासाठी योजना :—** (१) गुरे चारणे, नांगर बनविणे अशांसारख्या गावांच्या गरजा भागविण्यासाठी ग्रामसभा, संबंधित वन अधिका-यांशी विचार विनिमय करून लोकांकडून पारंपारिकरीत्या वापरल्या जाणा-या वन साधनसंपत्तीचा वापर करण्याकरिता गौण वनोत्पादनांची योजना तयार करील. या योजनेअंतर्गत, प्रत्येक व्यक्ती ही, साधनसंपत्ती नियोजन व संनियंत्रण समितीकडून परवानगीपत्र मिळाल्यानंतर साधनसंपत्तीचा वापर करण्यास सक्षम असेल.

(२) ग्रामसभा, गरीब व्यक्तींचे हित व त्यांची उपजीविका यांचे संरक्षण याची संनिश्चिती करता यावी म्हणून यासंबंधात आवश्यक ते निदेश देईल.

(३) वनसंवर्धन, पर्यावरणाची सुधारणा व ग्रामसभेच्या संबंधित अनुसूचित क्षेत्रामध्ये स्थानिक स्तरावर रोजगारात वाढ करणे यांकरिता संबंधित विभागांशी विचारविनिमय करून समुचित कार्यक्रम तयार करता येतील.

(४) ग्रामसभा क्षेत्रांमधून लाकूड किंवा वनोत्पादने घेऊन जाण्यासंबंधात कोणतेही चौकशी करण्यासाठी सक्षम असेल.

(५) चौकशी करताना कोणत्याही बेकायदेशीर कामांबद्दल संशय वाटत असेल तर ग्रामसभा तातडीने ते काम जागच्या जागी थांबविण्यास सक्षम असेल आणि, उचित कार्यवाही करण्यासाठी संबंधित प्राधिकरणाला ते कळवील.

(६) पंचायत, विकास समिती किंवा स्थायी समिती ही, गौण वनोत्पादन गोळा करण्यापासून ते त्याच्या मुल्यात वाढ करणे व ग्रामसभेच्या मान्यतेने, त्याची बाजारात विक्री करणे यांसारखी गौण वनोउत्पादना संबंधातील कामे हाती घेऊ शकेल.

(७) वरील कामकाजातील वित्तीय व्यवहार, ग्रामसभा किंवा शासनाने अधिकार प्रदान केलेले प्राधिकरण, यांच्याकडून तपासणी करण्याकरिता खुले असतील.

प्रकरण दहा

**बाजारांचे व्यवस्थापन**

४३. **अनुसूचित क्षेत्रांमधील बाजारांवर नियंत्रण :—** ग्रामसभा ही पुढील बाबींसह, तिच्या क्षेत्रातील बाजारांना मान्यता देण्यास, त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यास व त्यांचे व्यवस्थापन करण्यास सक्षम असेल :

(क) बाजारातील दुकानदार व ग्राहक यांना पाणी, तात्पुरता निवारा व इतर भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे,

(ख) बाजारात हानीकारक वस्तूंची आवक व विक्री यांना प्रतिबंध करणे.

(ग) व्यवहारांमध्ये वजन, माप व पैशाचे प्रदान चोखपणे केले जात आहे व त्यात कोणत्याहीप्रकारे शोषण केले जात नाही याची सुनिश्चिती करणे.

(घ) आकारण्यात येणा-या दरांविषयीची माहिती मिळविणे व तिची देवाणघेवाण करणे.

(ङ) दरांच्या बाबतीत फसवणूक किंवा चुकीची माहिती देणे इत्यादी सर्व अनुचित प्रथांना प्रतिबंध करणे ;

(च) बाजारात किंवा त्याच्या सभेवतालच्या क्षेत्रात जुगार, बेटिंग, सट्टे लावणे, कोंबड्यांच्या झुंजी यांसारख्या गोष्टींना प्रतिबंध करणे ;

(छ) लहान विक्रेत्यांव्यतिरिक्त बाजारातील दुकानदारांवर कर लादणे यासाठी पंचायतीस सल्ला देणे ;

(ज) वस्तुनिष्ठ तत्त्वांच्या आधारे, लहान विक्रेता म्हणून ती कोणती व्यक्ती पात्र असेल ते ठरवणे.

प्रकरण अकरा

**सावकारी**

४४. **अनुसूचित क्षेत्रामधील सावकारी व्यवहारांवर नियंत्रण :—** (१) ग्रामसभेस तिच्या सदस्यांमधून एक कर्ज नियंत्रण समिती घटित करता येईल.

(२) ही, समिती लायसनप्राप्त सावकारांसह बिगर शासकीय सावकारांकडून, होणा-या शोषणाच्या, व्याजखोरीच्या अवैध सावकारी किंवा अग्रिम या प्रसंगाची तपासणी करू शकेल.

(३) कोणतीही अवैधता आढळण्याच्या प्रसंगी, ऋण नियंत्रण समिती, तिचा अहवाल, शिफारशीसह कारवाईकरिता समुचित प्राधिकरणाकडे पाठवील.

प्रकरण बारा

**लाभार्थी निश्चित करणे, आयोजनांना मान्यता, पर्यवेक्षण इत्यादींबाबतचे अधिकार**

४५. **ग्रामसभेने अनुसूचित क्षेत्रामधील लाभार्थी निश्चित करणे :—** (१) ग्रामसभा, शासनाच्या योजना, सूचना व निदेश यांची एकरूपता लक्षात घेऊन विकास कार्यक्रमांकरिता, कुटुंबांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या आधारे गावातील लोकांमधून लाभार्थी निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे व निकषांना अंतिम रूप देण्यास सक्षम असेल.

(२) संबंधित विभाग ग्राम सभेला सर्व माहिती देईल. ग्रामसभा विचारविमर्श केल्यानंतर, लाभार्थींची यादी निश्चित करील.

४६. **ग्रामसभेची कार्यक्रमांना मान्यता :—** (१) पंचायतीने गावासाठीच्या योजना व प्रकल्पांकरिता सर्व ग्रामसभांची मान्यता मिळवणे तिच्यावर बंधनकारक असेल.

(२) गावामध्ये कोणताही कार्यक्रम किंवा प्रकल्प सुरू करण्यापूर्वी पंचायत, तो ग्रामसभेपुढे तिच्या मान्यतेसाठी सादर करील.

४७. **उपरोक्त नियम ४५ व ४६ यांबाबत विभागांनी व पंचायतीने ग्रामसभेच्या निर्णयाचे अनुपालन करणे :—** आपले अधिकार वापरताना ग्रामसभेने कोणत्याही संबंधित विभागाच्या अथवा आधिका-याच्या कार्यालयीन कामामध्ये अडथळा येईल किंवा अडथळा येण्याची शक्यता असेल असा निर्णय घेतला असेल तर त्याबाबतीत पुढीलप्रमाणे कार्यवाही केली जाईल :—

(क) संबंधित विभागाच्या प्रतिनिधी किंवा अधिकारी विवादग्रस्त बाबीवरील कारवाई पुढे ढकलील आणि ग्रामसभेला तिने आपल्या निर्णयावर पुर्नविचार करावा अशा विनंतीसह आपले मत सादर करील.

(ख) संबंधित विभागास ग्रामसभेचा निर्णय समाधानकारक वाटला नाही तर, ते प्रकरण निर्णयाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे निर्देशित केले जाईल त्यावर अधिनियम, १९९६ च्या तरतुदींच्या आधारे ते निर्णय देतील.

४८. **खर्चाचे प्रमाणन :—** ग्रामसभेने हाती घेतलेल्या कामांकरिता, ग्रामसभेकडून प्रपत्र " अ " मधील सर्व निधीच्या वापराचे प्रमाणन मिळविणे पंचायतीवर बंधनकारक असेल.

४९. **कामांसबंधी ग्रामसभेला द्यावयाचा तपशील :—** (१) त्या क्षेत्रामध्ये काम हाती घेतलेल्या सर्व संबंधित विभागांकडून चालू असलेल्या प्रत्येक कामांसंबंधिचा संपूर्ण तपशील ग्रामसभेच्या बैठकीत मांडण्यात येईल.

(२) कामाचा दर्जा आणि करण्यात आलेला खर्च यांच्याशी संबंधित कोणताही आक्षेप असल्यास ते प्रकरण ग्रामसभेपुढे ठेवण्यात येईल. ग्रामसभा त्या प्रकरणांचा तपास करील आणि त्यात सुधारणा करण्यासाठी योग्य त्या सूचना देईल.

(३) कोणताही कार्यक्रम पूर्ण झाल्यावर, त्याचा सविस्तर तपशील, ग्रामसभेच्या पुढच्या बैठकीत सादर करण्यात येईल.

५०. **सामाजिक क्षेत्राचे परीक्षण :—** (क) (१) ग्रामसभा, शाळा, रुग्णालये यांसारख्या स्थानिक संस्थांचे तसेच सर्व सामाजिक क्षेत्रीय योजनांचे वेळोवेळी परीक्षण करण्यास सक्षम असेल.

(२) ग्रामसभेस तिच्या परीक्षण कार्यामध्ये सहाय्य करण्यासाठी विशेष समित्या घटित करता येतील.

(३) स्थानिक संस्थांच्या सामाजिक क्षेत्रिय योजनांच्या कार्यान्वयनामध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने, ग्रामसभेने दिलेल्या सूचना विभागाच्या संबंधित पदाधिका-यांकडून योग्यरितीने विचार करण्यात येईल.

**५१. सामाजिक लेखाजोखा आणि विकास कार्यक्रमांचे संनियंत्रण :—** ग्रामसभा दक्षता व संनियंत्रण समिती स्थापन करील ही समिती पुढील गोष्टींची देखील सुनिश्चिती करील.–

(क) कामाच्या ठिकाणी आणि कोणत्याही सार्वजनिक ठिकाणीही कामासंबंधीची माहिती स्थानिक भाषेत दर्शविण्यात आलेली आहे.

(ख) कामाची प्रगती व दर्जा राखण्यात आला आहे.

(ग) कामगारांना नावाचे वाचन करून सार्वजनिक जागेत पगार दिला जातो.

**५२. अनुसूचित क्षेत्रामध्ये समाजाचा, सामाजिक, धार्मिक व परंपरागत व्यवस्थापन प्रथा यांच्याशी सुसंगत असा राज्याचा कायदा असणे :—**(१) राज्याच्या विद्यमान कायद्याच्या कोणत्याही तरतुदी अनुसूचित क्षेत्रात विस्तारित होत असताना त्या त्यांच्या रुढी, सामाजिक व धार्मिक प्रथा आणि समाजाच्या साधनसंपत्तीच्या पारंपरिक व्यवस्थापन प्रथा किंवा अशी कोणतीही विषयवस्तू, जी अनुसूचित क्षेत्राच्या अधिकारकक्षेत येते ती, यांच्याशी सुसंगत नाही, असे ग्रामसभेचे मत असेल तर, ती तशा आशयाचा ठराव संमत करील.

(२) अशा प्रकारे संमत केलेला ठराव ग्रामसभा जिल्हापरिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी, यांच्या कडे पाठवील, जो पाचव्या अनुसूचीच्या आवश्यकतेला अनुसरुन राज्यपालांना पाठवावयाच्या एका प्रतीसह, तो ठराव शासनाकडे पाठवील.

(३) शासन अशा ठरावावर आवश्यक ती कार्यवाही करील आणि त्या बाबत ग्रामसभेला सूचित करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. नरेश गिते,**

शासनाचे उप सचिव.


जिल्हा परिषद गडचिरोली
जिल्हा परिषद, गडचिरोली